# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे   अंक पाचवा   पृष्ठे १३   मे २०२३   www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


या अंकात


पान ०३ एक नूर आदमी, दस नूर कपडा

पान ०५ मॅट्रिमोनियल सायबर फ्रॉड. .

पान ०७ 'प्यार किया तो डरना क्या'

पान ०९ विसरलेले समाज - १ : नाझका



पान २ जिद्दी व मेहनती व्यावसायिकाची गोष्ट श्री. सचिन हरिश्चंद्र गुंजाळ


# पार्ले येथे ग्रंथ दिन साजरा



दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, पार्ले शाखा आणि पार्ले साहित्य कट्टा यांनी संयुक्तपणे ग्रंथ दिन साजरा केला.

या कार्यक्रमात प्रसिद्ध बालसाहित्यिक आणि कवी रमेश तांबे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी शाखेच्या अध्यक्ष लता गुठे यांनी श्री तांबे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. साहित्यिक आणि अध्यक्ष माधवी कुंटे यांनी आपल्या प्रास्तविक भाषणात २३ एप्रिल रोजी जगभरात साजरा होणाऱ्या ग्रंथ दिनाचे महत्व विशद केले. त्यानंतर अशोक बेंडखळे, रमेश सावंत, चारुलता काळे, सुधीर सुखटणकर , सविता दामले, ज्ञानेश चांदेकर यांनी ग्रंथ आणि त्यांचे वाचन याबद्दल आपले अनुभव मांडले आणि त्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले. प्रमुख अतिथि रमेश तांबे यांनी आपल्या भाषणात वाचनाचे महत्व विशद केले आणि त्यासंबंधात आपले रंजक अनुभव आणि बोधपर विचार मांडले. यावेळी त्यांनी आपल्या काही कविता सादर केल्या. या प्रसंगी वरील वक्त्यासहित पार्ले कट्ट्याची अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. याशिवाय इतर उपस्थित मान्यवर मंडळीत सदानंद डबीर, ज्ञानेश चांदेकर , पूजा राईलकर , प्रदीप पाटील, अल्पना कशाळकर, निशा वर्तक, ग्रंथालयाच्या मनिषा व नम्रता आणि काही सभासद यांचा समावेश होता. समारोपाच्या भाषणात सदानंद डबीर यांनी कार्यक्रमातील भाषणांचा आढावा घेतला आणि पुस्तके आणि भाषा याबद्दलची सद्यस्थिती स्वीकारून पुढे जायला हवे असे सांगितले.

# अरविंद प्रभू यांची आंतरराष्ट्रीय पिकलबॉल फेडरेशनच्या अध्यक्षपदी निवड



छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष श्री अरविंद रमेश प्रभू यांची आंतरराष्ट्रीय पिकलबॉल फेडरेशनचे पुढील अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. आयपीएफचे पिकलबॉलसाठी एकमेव प्रभावी जागतिक प्रशासकीय संस्था म्हणून नाव घेतले जाते. अरविंद यांच्या या निवडीमुळे त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

''एका आंतरराष्ट्रीय संस्थेचा अध्यक्ष होण्याचा मला पार्लेकर व भारतीय म्हणून अभिमान वाटतो. पिकलबॉल हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा क्रिडाप्रकार आहे. त्याला ऑलिंपिक मध्ये स्थान मिळवून देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे'' अशा भावना अरविंद प्रभू यांनी 'आम्ही पार्लेकर'शी बोलताना व्यक्त केल्या.




## संपादकीय

जगात आज सर्वत्र अनिश्चिततेचे वातावरण आहे. अमेरिकेसारखा बलाढ्य देश आज मंदीच्या उंबरठ्यावर आहे. अनेक नोकऱ्या कमी होत आहेत. Facebook, Amazon, Microsoft, सारख्या अवाढव्य कंपन्या सुद्धा हजारो 'Layoffs' जाहीर करत आहेत. ह्यात अनेक भारतीय तरुण आहेत व ह्या परिस्थितीत त्यांचे भवितव्य अंधकारमयच दिसत आहे. हे सर्व विस्ताराने सांगण्याचे कारण कि आज

पार्ल्याच्या बहुसंख्य घरातील तरुण परदेशी आहेत व त्यातील अनेक जण अमेरिकेतच स्थायिक आहेत. त्या अर्थाने पार्ल्याला नागपूर पेक्षा न्यूयॉर्क जवळ आहे असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. विकसित पायाभूत सुविधा, मोकळे कॉर्पोरेट व सामाजिक वातावरण, पैसे कमावण्याच्या व उडवण्याच्या असंख्य संधी, अशया अनेक गोष्टींमुळे जगभरचे तरुण अमेरिकेकडे आकर्षित होतात. ज्या कारणासाठी कोकणातले, यूपी-बिहार मधले लोकं मुंबईला येतात नेमक्या त्याच कारणांसाठी पुण्या - मुंबईतील लोकं अमेरिकेला जातात. हे अनेक दशकांपासून सुरु आहे आणि त्यात मराठी समाज सुद्धा आघाडीवर आहे. अमेरिकेत सुद्धा मराठी लोकांनी आपला ठसा तिकडील समाजावर पाडला आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. दर दोन वर्षांनी तुडुंब गर्दी खेचणारे बृहन् महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन हे त्याचेच द्योतक आहे.

मात्र ह्यापुढील काळ अमेरिकेसाठी पूर्वी इतका सुखकर असेल असे नाही. नोकरीची हमी नसेल तर किती मुले फक्त उच्च शिक्षणाच्या हौसेसाठी मोठे कर्ज डोक्यावर घेऊन अमेरिकेला जातील हा प्रश्नच आहे. ह्यातील दुसरा पैलू म्हणजे आज भारताची सुद्धा आर्थिक स्थिती पूर्वी इतकी वाईट नाही. आजमितीला भारताच्या आर्थिक प्रगतीचा वेग जगातील सर्व मोठ्या अर्थव्यवस्थांच्या तुलनेत जास्त आहे. आज आपल्या देशातच नोकरीच्या, उद्योगाच्या अगणित संधी उपलब्ध आहेत. युरोप अमेरिकेत जरी मंदी येऊ घातली असली तरी ती भारतात डोकावण्याची सुतराम शक्यता नाही असे बहुतेक तज्ज्ञांचे ठाम मत आहे.

ही सध्याची बदललेली परिस्थिती तरुणांनी, विशेषत: पालकांनी लक्षात घेतली पाहिजे. अनेक वर्षांपासून शिक्षणासाठी, नोकरीसाठी व पर्यायाने संपूर्ण आयुष्यासाठी परदेशी जाण्याचा जो प्रघात आपल्याकडे पडला आहे त्याचा पुनर्विचार करण्याची वेळ आता आली आहे. तुम्हाला काय वाटते ?


आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
अवंती मांडवकर
तानिया गायकवाड

editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – अेस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com


# जिद्दी व मेहनती व्यावसायिकाची गोष्ट

आज पार्ल्यामध्ये एक सहज चक्कर टाकली तरी प्रामुख्याने दिसते की प्रत्येक रस्त्यावर कोणत्या ना कोणत्या इमारतीच्या पुनर्विकासाचे काम चालू आहे. त्याच वेळेला सुव्यवस्थेत व नीटनेटके असे एक नाव रस्त्या - रस्त्यावर दिसून येत आहे. ते म्हणजे 'अथर्व बिल्डर्स ' चे अशा या अथर्वचे कर्तेधर्ते आहेत श्री. सचिन हरिश्चंद्र गुंजाळ. सामान्य परिस्थितीतून मेहनतीने व्यावसायिक झालेला एक मराठी माणूस. श्री. शैलेशभाई शहा हे ज्येष्ठ व्यवसायिक त्यांचे भागीदार आहेत.

श्री. सचिन हे लहानपणापासून अंधेरीतील विजयनगर सोसायटीमध्ये वाढले त्यांचे शिक्षण परांजपे शाळेत झाले. पहिल्यापासून काम करायची आवड व गरज यामुळे त्यांनी पेपरची त्याचबरोबर दुधाची लाईन टाकण्याचे काम केले. दहावीत असताना फटाक्यांचा व्यवसाय



केला. यातून नोकरीपेक्षा व्यवसायात कमाई चांगली होते याचा धडा त्यांना मिळाला. वडील श्री. हरिश्चंद्र गुंजाळ हे मूळचे अलिबाग जवळील आवास गावचे. ते कलाम इंडस्ट्रीजमधे टर्नर फिटर होते. त्यांना तब्येतीमुळे ती नोकरी सोडावी लागली. त्यानंतर ते व आई सुरेखा गुंजाळ गावाला जाऊन स्थायिक झाले. सचिन यांनी बारावीनंतर बॉयलर अटेंडन्सचा कोर्स केला व पोदार मिलमध्ये शिकाऊ म्हणून कामाला लागले. आई वडील गावाला गेल्यावर त्यांनी जेवणाच्या नियोजना करता म्हणून बहार टॉकीज जवळ झुणका भाकरी केंद्र चालवले. त्यावेळी मोठा भाऊ निलेश गुंजाळ हा इस्टेट एजंट श्री. सुनील कोलते यांच्याबरोबर काम करत होता. श्री. कोलते व निलेश यांनी सचिन यांची धडपड बघून त्यांना स्टॅम्प ड्युटीचे काम करणाऱ्या श्री. कालेकर साहेबांकडे नेले. त्यांनी सचिन यांना काम शिकवायचे व थोडा शिकाऊ पगार द्यायचे कबुल केले. सचिन मनापासून शिकले व त्यांनी हळूहळू स्वत:च कामे घेण्यास सुरुवात केली त्याबरोबर व्यवसाय देखील यशस्वीपणे वाढवला. त्यानंतर स्वत:चे ऑफिस घेतले व पार्ल्यात घर घेऊन राहायला आले. २००३ मध्ये सौ. साक्षी यांच्याशी विवाह व त्यानंतर मुलगा अथर्व याचा जन्मही झाला. त्यांच्या संसाराला बहर आला.

कामानिमित्त सचिन यांचा एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी संपर्क आला. त्यांनी सचिन यांना ''अरे तू स्टॅम्प ड्युटीची कामे करतोस. पण तुझ्यात बिल्डर बनण्याची कुवत आहे. तू स्वत:च व्यवसाय सुरू कर'' असा सल्ला दिला. व्यवसायिक बनण्याची मनोमन इच्छा असणाऱ्या सचिन यांनी यावर विचार सुरु केला. स्वत:चे गावचे घर बांधताना, नंतर भाड्याने देण्यासाठी



खोल्या बांधताना सचिन यांनी स्वत: काम केले होते. चौकस स्वभावामुळे तेथील कारागिराबरोबर माहिती मिळवली होती. त्या अनुभवावर २०१० साली अलिबागला एका पार्टनर सोबत एक इमारत बांधली व बांधकाम व्यवसायात पहिले पाऊल टाकले. त्यानंतर पार्ल्यात प्रथमच २०१४ साली श्री. शैलेश भाई शहा यांना भागीदार घेऊन 'अथर्व रोजवुड' ही इमारत बनवायला घेतली. त्याकरता सुरुवातीला त्यांनी व्याजी पैसे घेऊन काम केले. पण यापुढे कमीत कमी भांडवल बाहेरून घ्यायचे व स्वत:चे मूळ भांडवल निर्माण करायचे हा निश्चय करत २०१६ मध्ये रोजवुर्ड पूर्ण केली.

नंतर पार्ल्यातील पश्चिम विभागात 'अथर्व शगुन' ही इमारत बांधली. या सर्वातून सचिन बांधकामातील खाचाखोचा, बांधकाम, सहकारी, तसेच इमारतीतील मूळ रहिवाश्यांशी स्नेहबंध जुळवणे आदी गोष्टी शिकत केले. श्री. शैलेश शहा यांची चांगली साथ त्यांना मिळाली. श्री. शैलेशभाई आज वयाच्या पासष्टीतही सकाळी बरोबर अकरा वाजता वाळकेश्वरहून हजर असतात. सर्व व्यवहारांवर त्यांचं लक्ष असते. मात्र सचिन यांच्यावर त्यांचा गाढ विश्वास आहे. त्यानंतर पुन्हा पार्ल्यातील 'अथर्व पॅलेस व अथर्व प्राइड' या इमारती विकसित केल्या. २०१९ ला 'सरस्वती निलायम' ही इमारत बनवायला घेतली. पण २०२० साली कोविड सुरू झाला. त्यामुळे येणाऱ्या सर्व अडचणींशी सामना करत २०२१ ला इमारत पूर्ण करून रहिवाशांच्या ताब्यात दिली. २०२१ साली अथर्वने 'नवसमाज' ह्या मोठ्या प्रोजेक्ट सोबतच 'मुरली'( मालवीय रोड) ग्रीन हाऊस (नेहरू रोड) प्रभुनिवास (चित्तरंजन रोड)अशी दर्जेदार काम मिळवली. जी सध्या कार्यरत आहेत. आजवर केलेल्या कामाची पद्धत बघून त्याच्या जोरावर अथर्व बिल्डर्सला मोठी झेप घेत २०२२ ला अंधेरीतील 'चंद्रशेखर सोसायटी'चे काम मिळाले व पाठोपाठ अंधेरीतील वृंदावन सोसायटी. सचिनला पार्ला, अंधेरीतच कामे घ्यायला मनापासून आवडतं. याचं कारण ते देतात की, ''ही माझी भूमी आहे. मी इथेच मोठा झालो. लोक मला ओळखतात. म्हणूनच इथे काम करताना प्रत्येक काम चांगलं होण्यासाठी मी आपोआप आग्रही होतो. कारण इथल्या मातीशी माझी नाळ बांधलेली आहे. याचमुळे घेतलेले प्रत्येक प्रोजेक्ट वेळेत व व्यवस्थित दिले जाते.''

व्यवसायातील यशामागे सचिन यांचे कष्ट, चिकाटी, व्यवसायाची ओढ, जिद्द हे गुण तर आहेतच. पण त्याचबरोबर सकाळी लवकर साइटवर जात राहणे ज्यामुळे सर्व काम करणाऱ्यांवर लक्ष राहते. कोणत्याही इमारतीच्या पायाचे काम चालू असताना आजही ते स्वत: तिथे हजर असतात. कारण बांधकामात पायाला अनन्यसाधारण महत्त्व असते. लोकांचा विश्वास संपादन करणे व तो आपल्या कामातून, वागण्यातून, दिलेला शब्द वेळेवर पुरा करण्यातून टिकवणे हेही यशाचे गमक आहे. ''लोक कमवायला व टिकवायला मी सुनील दादा (श्री. सुनील कोलते) कडून शिकलो.'' हे ते आवर्जून सांगतात. सुरुवातीच्या काळात त्यांनी केलेल्या सहकार्याने आजचे यश दिसत आहे. सचिनकडे वीस-पंचवीस वर्षांपूर्वी सहकारी म्हणून आलेले भरत नाईक व सचिन बरोबर शाळेपासून असलेले वर्गमित्र समीर, तुषार तसेच इतर अनेक जण आजही त्यांना वेगवेगळ्या विभागात साथ देत आहेत व त्यासाठी सचिन यांच्या मनात त्यांच्याबद्दल कृतज्ञता आहे हे त्यांच्या बोलण्यातून लक्षात येते.

व्यवसायात सचिन यांचे आदर्श श्री. रतन टाटा आहेत. त्यांच्याप्रमाणेच उत्तम व्यवसाय व आदर्श आचरण ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आज ३०० माणसांचा व्याप सांभाळणाऱ्या सचिन यांनी मोठ्या कंपन्याप्रमाणेच सर्वांना मेडिक्लेम, शिक्षण, प्रवास आदी सोयी उपलब्ध केल्या आहेत. कंपनीतल्या सहकार्यांना त्यांच्या आर्थिक ताकदीनुसार पार्ला, अंधेरी, घाटकोपर, विरार अशा ठिकाणी स्वत:चे घर मिळवून



देण्यास त्यांनी मदत केली आहे. तर काहींना गावाला घर बांधायला मदत केली. घर निर्माण करणाऱ्या व्यवसायातील प्रत्येकाला निदान एक तरी हक्काचे छप्पर असलेच पाहिजे हा त्यामागील विचार आहे. त्यांच्या आईच्या संस्काराप्रमाणे ते नफ्यातील १/३ भाग त्यांच्या स्टाफसाठी, २० टक्के बचत, ५ टक्के समाजाचे देणे व उरलेला मालकासाठी याप्रमाणे विभागात. वाचनाची सवय व उत्तम साथ संगत यांचा फार मोठा वाटा ते जडणघडणीत मानतात. विलेपार्लेतील या इमारती घडवताना तेथे राहणारे ९५% लोक ब्राह्मण समाजातून होते. त्यांच्या संगतीत माझे मोठे शिक्षण झाले असे ते मानतात. या लोकांच्या प्रचंड अपेक्षा नसतात पण हक्काची एकही गोष्ट ते सोडत नाहीत. असे तत्त्वनिष्ठ वागणे माझ्यात बदल करून गेले. चंद्रशेखरच्या कामात श्री. प्रमोद लेले यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रत्येक इमारतीचे वेळी होणारा प्रत्येक लहान मोठा खर्च व थोडा आयत्यावेळी वाढणारा खर्च याचा पूर्ण विचार करूनच जर कामाला हात घातला तर फार त्रास होत नाही. अचानक बदलणारे कायदे अथवा नियम यांनी ५ ते १०% फरक पडतो. पण त्यात थोडा फायदा कमी होतो. इमारत पूर्ण करायला त्रास होत नाही. अशावेळी आपलं मन मोठ करायचं असतं. त्याचप्रमाणे प्रत्येक प्रोजेक्टची मी पूर्ण आयओडी

पान ११ वर

# एक नूर आदमी, दस नूर कपडा

जुईलीचा स्वत:चा वडाळा येथे डिझाईन स्टुडिओ आहे तसंच 'जुईली' नावाचा स्त्रियांच्या कपड्यांचा ब्रँड आहे. या वेगळ्याच वाटेने पार्ल्यातली ही मध्यमवर्गीय मराठी मुलगी कशी गेली ते जाणून घेण्यासाठी मी जुईलीला भेटले.

तिला लहानपणापासूनच चित्रकला-हस्तकलेची आवड होती. सहावी-सातवीपासूनच शाळेच्या वह्या-पुस्तकांमध्ये ती कपड्यांची छानशी चित्रं रेखाटायची. चित्रं पाहून सगळे कौतुक करायचे. कपड्याचा पोत, कसे कटिंग केले की छान दिसेल हे तिला हळूहळू उमगत गेलं. मग आईसोबत कपडे शिवायला गेली की जुईली शिंप्याला सांगायची की हा कट असा घ्या, हा ऍंगल असा हवा, ही फॅशन अशी करा. सहजप्रेरणेनेच तिला जाणवू लागलं की मोठेपणी आपण यातच काम करायचं. बारावी कॉमर्सनंतर एसएनडीटी, जुहू येथे तिने फॅशन डिझाईनचा तीन वर्षांचा डिप्लोमा केला. या अभ्यासक्रमात शिवणकलेसोबत कला, कलेचा इतिहास, इलस्ट्रेशन्स, चित्रकला हेही शिकवलं जातं. उत्तीर्ण झाल्यावर विसाव्या वर्षीच ती फॅशन डिझायनिंगच्या मोठ्या कंपनीत नोकरी करू लागली. आयटीसीच्या विल्स लाईफस्टाइल कंपनीत गुरगावला सात वर्षे तिनं नोकरी केली. स्वत:चा व्यवसाय करायचा हे मनात होतंच पण नोकरी करताना मनातील कल्पनांना आकार मिळाला.




जुईलीचे वडील आणि प्रख्यात लेखक अशोक बेंडखळे आणि कलाप्रेमी आई अंजली बेंडखळे यांचा लेकीला पाठिंबा होता. जुईली म्हणते की पुष्कळदा मुलग्यांवर शिक्षणाबाबतीत सामाजिक दबाव असतो. त्या मानाने उत्पन्नाची निश्चिती नसलेल्या नव्या, अनवट क्षेत्रांत पाऊल टाकण्याची संधी मुलींना दिली जाते. या मानसिकतेचाही मला मुलगी म्हणून लाभ मिळाला.




नोकरीतील बचत आणि वडिलांची मदत यांच्या बळावर जुईलीने फॅशन स्टुडिओ काढला. प्रारंभी लॅक्मे फॅशन वीकमध्ये तिचा ब्रँड निवडला गेला. हळूहळून जुईलीच्या व्यवसायाने उभारी घेतली. इंडियन आणि इंडो वेस्टर्न कपडे ही तिची खासीयत आहे. टाऊनसाईडची आणि देशभरातील ओगान, मेलाँज अशा मल्टीडिझाईन स्टुडिओजकडे तिच्या ब्रँडला मागणी असते. त्याशिवाय ईंडियन मर्चंट्स चेंबर, सहचरी फाऊंडेशन अशा संस्थांच्या प्रदर्शनांतून जुईलीला ग्राहक मिळतात. प्रारंभी जुईली प्रदर्शनांमध्ये भाग घ्यायला बिचकायची पण मग तिच्या लक्षात आलं की त्यात कठीण काहीच नाही, उलट व्यवसाय-वाढीसाठी ते आवश्यकच आहे.

देशा-परदेशात ठिकठिकाणी जुईली प्रदर्शनांसाठी जाते. एन.आर.आय 'जुईली ब्रँड'चे कपडे आवडतात. भारतातल्याही बिझिनेस फॅमिलीज, राजकारणी यांच्या घरातल्या महिलावर्गाला जुईली ब्रँडचे कपडे पसंत पडतात.


सध्या स्पर्धाही खूप असल्याने ग्राहकाला 'व्हॅल्यू फॉर मनी' वाटलं तरच तो कपडा विकत घेणार. जुईली म्हणाली की कामात व्यावसायिकता आणि वागण्यात सरळपणा असला की मस्कापॉलिशीची गरजच नसते. 'किती खरं बोलली ही मुलगी' असंच तिचा निरोप घेताना माझ्या मनात आलं. (तिचा इन्स्टाग्रामचा अकाऊंट-zuilee.india असा आहे.)



सविता दामले
९९३०३ ११५४६



# रंगुनी रागांत साऱ्या



## यमन

सगळ्यात लोकप्रिय राग म्हणजे यमन. हा आणि कल्याण एकत्र धरले जातात. तज्ञ मंडळी दोन्ही मध्यम यमन कल्याण आणि फक्त तीव्र मध्यम यमन असा फरक दाखवतात पण सामान्य पणे हा राग मी तरी एकच मानतो. या रागात असंख्य चीजा आहेत तशीच सर्वात जास्त गाणी याच रागात. Competition मध्ये राग ओळखा आले कि यमन ठोकून द्यायचा, पन्नास टक्के वेळा उत्तर बरोबर. आनंदी, खेळकर, रोमँटिक बरोबर थोडी सुख दु:खाची आंबट गोड चव देणारा हा हापूसचा आंबा म्हणजे यमन, एक कर्णमधुर राग. हा संध्याकाळी गातात.

ख्याल गायकीत भीमसेनजींचे 'एरी आली पियाबिन' किंवा 'शाम बजाये आज मुरलीया' किंवा 'पियाकी नजरिया जादू भरी' ऐकलं नाही असा रसिक पार्ल्यात अथवा पुण्यात शोधून मिळणार नाही. संगीत शिकताना ह्याच रागाने सुरुवात करतात बहुतेक वेळा. विद्यार्थी खूष असतो कारण त्याला 'जब दीप जले आना' गाता येत असं त्याला वाटत आणि आता सर्व सोपं आहे असं मनोमन पटत. पण हा राग गायला जितका सोपा वाटतो तेवढा सोपा नाही हे प्रयत्न केल्यावर कळत. प्रथम 'पलटे' करताना तीव्र मध्यम नीट लागत नाही, लागलाच तर पुढचा प्रॉब्लेम आडवा येतो. 'पियाकी नजरिया' किंवा 'एरी आली पियाबिन' ह्या बंदिशी त्रितालाच्या पहिल्या मात्रेवर नाही तर नवव्या मात्रेवर उचलायच्या असतात अश्या अनेक गोष्टी हळू हळू कळतात आणि विद्यार्थी जमिनीवर येतो. जे विद्यार्थी या पायरीच्या वर जातात तेच टिकतात. मग हळू हळू धीर धरायला शिकून 'मन रे तू काहे ना धीर धरे' सुरात गाऊ लागतात.

बहुतेक सर्व प्रतिथयश कलाकारांनी यमन हा आपलासा केला आहे कारण हा राग खूप सरळ, गोड आणि लोकप्रिय मानला जातो. प्रेक्षक ही 'यमन' नाव ऐकल्यावर टाळ्या वाजवतात गाणं सुरु व्हायच्या अगोदर. गायन आणि वादन दोन्ही प्रकारात हा पहिला.

मराठी मध्ये या रागावर असंख्य सुंदर गाणी आहेत. यमन ऐकताना आपण एका सुखी, समाधानी मूड मध्ये सहज येतो आणि मनात हे गुणगुणतो, 'जीवनात ही घडी अशीच राहू दे'. हेच या रागाचे लक्षणगीत. हा मूड बरोबर यमन दाखवतो. अरुण दाते यांचे 'शुक्रतारा मंद वारा' किंवा बाबूजींचे 'धुंदी कळ्यांना', 'तोच चंद्रमा नभात' परफेक्ट यमन. मंगेशकर घराणे यमन चे भक्त च. 'तिन्हीसांजा सखे मिळाल्या', 'का रे दुरावा', 'तुज मागतो मी आता'. सगळ्यात त्यांना आवडलेलं शांता शेळकेंचं 'मागे उभा मंगेश'. गोवेकर आणि मंगेशकर असल्याने हे गाणं त्यांच्या हृदयात आणि रसिकांच्या मनात कोरलंय.

सर्व हिंदी संगीतकार या रागात एकतरी गाणं करतातच. सगळी गाणी लिहिणे शक्य नाही.

काही गाणी कितीही वर्ष झाली तरी आवडतात. 'चंदन सा बदन', ह्यात नूतन बरोबर हिरो कोण होता हे सांगितलंत तर तुम्हारे चरण स्पर्श तो बनताही है. पण गाणं आठवतं आणि ओठांवर येत.

जिंदगी भर नहीं भुलेगी वो बरसात कि रात, जब दीप जले आना, जीवनडोर तुम्हीसंग बांधी, वो जब याद आये, वो श्याम कुछ अजीब थी, मौसम है आशिकाना ह्या गाण्यांची गोडी रागामुळे निश्चित. गायक, संगीत कार, नट कसलेही परिमाण न लावता निखळ लोकप्रिय.

देव आनंद हा त्याच्या पहिल्या सत्रात अतिशय रोमँटिक आणि देखणा. त्याला असं यमन मध्ये गाणं मिळालं कि त्याच cult song सहज होत. 'अभी न जाओ छोडकर के दिल अभी भरा नही'. यमन ऐकणाऱ्यांना हे असच चालू रहावं असं वाटणं अगदी स्वाभाविकच आहे. कोणाचही दिल कधीच न भरणारा मूड तयार करणे हाच तर ह्या रागाचा महिमा.

आता मेहंदी हसन. हा माणूस विलक्षण आहे. शायरी निवडण्यात एकदम निपुण आणि त्या शब्द हिऱ्यांना रागाच्या अचूक कोंदणात बसवणे यांच्याइतके कोणालाच जमत नाही. आज इतकी वर्ष होऊन सुद्धा ही गझल यमन ची प्रातिनिधिक पताका मानली जाते. 'रंजीश ही सही, दिल ही दुखाने के लीये आ'. 'आ फिरसे मुझे छोडके जाने के लिये आ'.

कल्याण थाटाच्या या यमन ने रसिकांचे खरोखरीच कल्याण केले आहे यात शंका नाही.



मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८



# मॅट्रिमोनियल सायबर फ्रॉड. .

संगणकाच्या माध्यमातून हल्ली आर्थिक देवाण-घेवाण खूप मोठ्या प्रमाणात होते पण योग्य काळजी, खबरदारी न घेतल्यास त्यामध्ये फसवणुकीचे प्रकार देखील खूप वाढले आहेत. असे प्रकार टाळण्याकरता जनजागृती फार



महत्त्वाची असते कारण जनतेला जर का माहीत असेल की असे दिशाभूल करणारे, लालच दाखवणारे जे कॉल्स, ई-मेल्स येतात त्याला प्रतिसाद देणे योग्य नाही, उचित नाही, तरच ते या फसवणूकीपासून स्वत:चा बचाव करू शकतात. त्या दृष्टिकोनातून जनजागृतीचा एक भाग म्हणून आज मी एक केस आपल्यासमोर सादर करत आहे ही सत्य घटना आहे आणि यातून सर्वांनी योग्य तो बोध घ्यावा.

विलेपारले परिसरात राहणाऱ्या एका तीस वर्षीय महिलेने 'जीवनसाथी डॉट कॉम' या वेबसाईटवर स्वत:चे लग्न जुळवण्याच्या दृष्टिकोनातून स्वत:ची माहिती अपलोड केली होती. काही दिवसातच तिला एका हिंदी भाषिक व्यक्तीचा फोन आला त्या व्यक्तीने तिला सांगितले की, त्याने त्या महिलेची सर्व माहिती वेबसाईटवर पाहिली आणि त्याला तिचे स्थळ योग्य वाटल्याने स्वत:ची सर्व माहिती तिला ईमेल द्वारे पाठवलेली आहे. त्याप्रमाणे तिला खरोखर एक ईमेल आला होता त्या ईमेल द्वारे त्याने माहिती दिली होती की दिल्ली येथे त्याचा इमारत बांधकाम व्यवसाय आहे, त्याचे वडील ऑस्ट्रेलियन नागरिक आहेत तर आई भारतीय नागरिक आहे. त्यानंतर दोघेही एकमेकांशी व्हाट्सअप द्वारे संपर्क साधत राहिले. तिला इम्प्रेस करण्याकरिता स्वत:बद्दल तो खूप अतिरंजित अशी माहिती तिला पाठवत होता. त्याच्या श्रीमंती बाबत खूप मोठ्या मोठ्या भूलथापा तो मारत होता. कालांतराने त्याने सांगितले की, तो व्यवसायानिमित्त लंडन येथे जात आहे तेथे गेल्यावर तो तिच्याशी संपर्क करेल. त्याप्रमाणे काही दिवसातच तिला आंतरराष्ट्रीय मोबाईल क्रमांकावरून फोन आला. त्या फोनवरती तोच व्यक्ती बोलत होता त्याने तिला सांगितले की त्याचे एक अकाउंट 'रॉयल बँक ऑफ स्कॉटलंड', लंडन या ठिकाणी आहे. त्या ठिकाणी तिचे देखील एक अकाउंट तो सुरू करू इच्छितो. त्यास सदर महिलेने प्रथम नकार दिला परंतु त्यांनी खूपच गळ घातल्यावर तिने अकाउंट उघडण्यास होकार दिला आणि आवश्यक ती माहिती त्या व्यक्तीला दिली. काही दिवसांनी सदर व्यक्तीने त्या बँकेमध्ये तिचे अकाउंट उघडले आहे आणि त्यामध्ये काही रक्कम देखील त्याने जमा केली आहे असे सांगून अकाउंट नंबर पासवर्ड आणि इतर माहिती तिला पुरवली. त्याप्रमाणे दिलेल्या लिंक वरती क्लिक केले असता त्या बँकेचे वेब-पेज उघडले गेले. त्या पेजवरनं तिने तिचा अकाउंट नंबर आणि पासवर्ड टाकला असता तिच्या अकाउंट मध्ये




रुपये चार करोड पन्नास लाख इतकी रक्कम जमा केली असल्याचे दिसून आले. तिचे डोळे विस्फारले, क्षणभर तिला विश्वासच बसेना. ती त्याच्यावर पूर्णपणे भाळली, हिप्नोटाइज झाली. पुढे त्याने तिला असेही सांगितले की, ही तर फार छोटी रक्कम आहे भविष्यामध्ये तो आणखीन रक्कम त्या बँकेमध्ये जमा करेल. तसेच तो काही कामानिमित्त आणखीन इतर ठिकाणी प्रवास करणार आहे त्यामुळे त्याचा फोन चालू नसणार परंतु बँकेचे अकाउंट चालू करण्याच्या दृष्टीने त्याचा स्टाफ तिला संपर्क साधतील. ती महिला पार हुरळून गेली होती. दुसऱ्याच दिवशी एका भारतीय महिलेचा तिला फोन आला तिने तिला सांगितले की बँक अकाउंट चालू करण्याच्या दृष्टीने एक टक्का 'एक्टिवेशन फी' भरावी लागेल आणि दिल्लीतील एका बँकेचा अकाउंट नंबर तिला दिला. वास्तविक पाहता ज्या बँकेमध्ये अकाउंट आहे त्याच बँकेमध्ये एक्टिवेशन फी किंवा इतर गरजेची रक्कम भरणे ही सर्वसाधारणपणे प्रक्रिया आहे परंतु या



महिलेला त्यावेळेस तसे काही सुचले नाही आणि तिने रुपये ४५ हजार इतकी रक्कम दिलेल्या अकाउंट मध्ये भरली. त्यानंतर पुढील चार-पाच महिन्याच्या कालावधीमध्ये असे अनेक फोन तिला आले. सर्व फोन भारतातील विविध शहरातून आले होते आणि त्या महिलेला करन्सी कन्वर्जन चार्जस् , रिजनल ट्रान्सपोर्ट चार्जेस, रिजनल इनलँड रेवेन्यू चार्जेस, अँटी टेररिझम सर्टिफिकेट चार्जेस असे भरावयास लावून त्या कालावधीमध्ये तिच्याकडून एकूण रुपये ६१ लाख इतकी रक्कम त्यांनी फसवणूक करून प्राप्त केली. तिच्या अकाउंटमध्ये साडेचार करोड रुपये आहेत या भरवशावरती ती ही रक्कम भरत गेली. यादरम्यान सदर व्यक्ती पुन्हा तिच्या संपर्कात आला. त्याने तिचा विश्वास संपादन करण्याच्या दृष्टीने त्याच्या सो-कॉल्ड ऑस्ट्रेलियन वडिलांबरोबर फोनवर संपर्क देखील करून दिला. असे असले तरी तो

पान ७ वर






# युरोपमधे डॉक्टर होण्याची संधी

मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसिया इन केटोविक, पोलंड ची स्थापना १९४८ या वर्षी झाली. तेव्हा पासून साधारण ७५ वर्षे युनिव्हर्सिटीचा विस्तार आणि विकास होत आहे. पहिल्या वर्षी शिकवायची सुरुवात झाली तेव्हा, मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसिया इन केटोविक येथे मेडिकल आणि मेडिकल-डेन्टल या विद्याशाखेत साधारण २०० विद्यार्थी होते. वर्तमान काळात ५ विद्या शाखा आणि १८ मेडिकल स्पेशालिटीज (विशेष) विभागात, साधारण ११,००० विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी ६ हॉस्पिटल्स आणि दंत विषयक (डेन्टिस्ट्री) शैक्षणिक केन्द्रांमधून शिकत असतात आणि त्यांच्या कौशल्यांना अधीक निपुणता देत असतात.

राष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन प्रणालीचा अविभाज्य भाग या नात्याने, मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसिया इन केटोविक आपले ध्येय म्हणून वास्तविक संशोधनाचे आयोजन करणे आणि ते पोहचवणे हे काम विद्यार्थी प्रशिक्षणाने करते.

१९९६ मध्ये मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसिया इन केटोविक येथे वैद्यकीय (औषध) क्षेत्रातील अभ्यासक्रम इंग्रजी माध्यमातून आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी खुला केला. २०२३ या वर्षी यूनिवर्सिटीने इंग्रजी माध्यमातून ९ अभ्यासक्रम दिले ते पुढील प्रमाणे आहेत.

युनिफाइड मास्टर्स डिग्री प्रोग्राम (एकत्रित पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रम) या शिर्षकाखाली: मेडिसिन (वैद्यकीय), डेन्टिस्ट्री (दन्त चिकित्सा), सायकोथेरपी (मानसोपचार) आणि फार्मसी (औषध विषयक).

फर्स्ट सायकल डिग्री प्रोग्राम ऑफ ( पुढील शाखांचा प्रथम चक्र अभ्यासक्रम): मेडिकल बायोटेक्नॉलॉजी, नर्सिंग(शुश्रूषा), मिडवाइफरी (सुतिका शास्त्र), आणि पब्लिक हेल्थ (सार्वजनिक आरोग्य).

सेकंड सायकल डिग्री प्रोग्राम ऑफ (पुढील शाखांचा द्वितीय चक्र अभ्यासक्रम): मेडिकल बायोटेक्नॉलॉजी, नर्सिंग(शुश्रूषा), मिडवाइफरी (सुतिका शास्त्र), आणि पब्लिक हेल्थ (सार्वजनिक आरोग्य) आणि डाएटेटिक्स (आहार शास्त्र).

आमचा सिग्निफिकन्ट मेडिसिन प्रोग्राम (लक्षणीय वैद्यकशात्र अभ्यासक्रम) हा ६ वर्षांचा अभ्यासक्रम आहे जो औपचारिक( फॉर्मल) परीक्षा दिल्यावर पूर्ण होतो. पदवी मिळाल्यावर युनिव्हर्सिटी ६ महिने इंटर्नशिप (प्रशिक्षण कार्यक्रम) देते.

मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसिया इन केटोविक येथे वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रतिवर्षी दोन सत्रांमधे प्रवेश दिला जातो. फॉल आणि स्प्रिंग सेमिस्टर. युनिव्हर्सिटीत युरोपियन आणि इन्टरनॅशनल (आंतरराष्ट्रीय) अशा दोन प्रकारचे अभ्यासक्रम राबविले जातात. मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसिया इन केटोविक येथील अभ्यासक्रमांना पोलिश एक्रीडिटेशन कमिटी, एक्रीडिटेशन कमिटी ऑफ अकॅडेमिक मेडिकल युनिव्हर्सिटीज, यू.एस. डिपार्टमेन्ट ऑफ एज्युकेशन, मेडिकल बोर्ड ऑफ न्यू यॉर्क आणि कॅलिफोर्निया या मान्यवर संस्थांचे एक्रीडिटेशन आणि रेकगनिशन (अधिकृत मान्यता)आहे.

पात्रता: सेकंडरी स्कूल लिव्हिंग परीक्षा (माध्यमिक शाळा परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र)/ फायनल परीक्षा अॅडव्हान्स्ड/अेक्सटेंडेड लेव्हल जी प्रवेश पध्दतीसाठी आवश्यक असेल.

विषय:

बायोलॉजी (जीवशास्त्र) आवश्यक.

केमिस्ट्री (रसायन शास्त्र) किंवा फ़िज़िक्स (पदार्थ विज्ञान) किंवा मॅथमॅटिक्स (गणित).

डेन्टिस्ट्री प्रोग्रॅम (दंतवैद्यक कार्यक्रम/ अभ्यास). हा आमचा दुसरा लक्षणीय अभ्यासक्रम जो पूर्ण करायला ५ वर्षे लागतात, ज्यामध्ये थिओरॅटिकल (सैध्दांतिक), प्रि-क्लिनिकल (पूर्वनिष्ठ),क्लिनिकल (चिकित्सा विषयक) आणि समर हॉलिडे इन्टर्नशिप (प्रशिक्षण कार्यक्रम) याचा समावेश होतो.

मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसिया इन केटोविक मधील शिक्षण विद्यार्थ्याला पोलंड मधील एका सर्वात मोठ्या वैद्यकीय आणि सिम्युलेशन (सरावासाठी/ प्रशिक्षणासाठी बनवलेल्या) केंद्रात प्रवेश मिळवून देते. तेथे खऱ्या हॉस्पिटल मधील कामा प्रमाणे वातावरण निर्मिती केलेली असते. या सेंटरला ऑपरेटिंग (शस्त्रक्रिया) रूम, इन्टेन्सीव्ह केअर (अति दक्षता) रूम, २ हॉस्पिटल इमर्जेन्सी ( रुग्णालय आपत्कालीन) रूम्स, पेडिॲट्रिक (बालरोग) रूम आणि डिलिव्हरी (प्रसुती) रूम असे सहा कक्ष आहेत या शिवाय हॉस्पिटलमधे दाखल होण्यापूर्वीची प्रक्रिया तसेच ॲम्ब्युलन्स प्रशिक्षणाच्या सरावासाठी वेगळी जागा आहे.

मेडिकल युनिव्हर्सिटी ऑफ सिलेसिया इन केटोविक येथे प्रवेश घेण्याची तारीख २८ एप्रिल ते ११ जून.

कॉम्प्लिमेंटरी (पूरक) प्रवेश विन्टर सेमिस्टर २०२३/२४

२२ जुलै रोजी सुरू होईल.

अधीक माहितीसाठी कृपया डी. बी. काळे, हायगेट अकॅडमी इंडिया , मोबाईल: ९८७०४९९९५३ या नंबर वर फोन करावा अथवा info@haindia.com या ई - मेलवर संपर्क करावा.

-दिगंबर काळे


BECOME A DOCTOR IN PUBLIC UNIVERSITIES, POLAND

- Coaching in English language
- Medicine, Dentistry,
- Public health and Nursing
- Intake starts in September 2023.
- Limited seats available

Admissions open for Medical Universities in Poland



We are Overseas Education Consultant

What we do

- Selection of Country Courses & Submission of Applications
- University admissions.
- Bank loan
- Visa Application
- Overseas Student accommodation.
- Test preparation coaching for IELTS. TOFEL. PTE. GRE. And GMAT.
- Forex Transfer.
- Internship programs for Australia and USA

Contact : D B Kale.
: +91 9870499953

Highgate Academy (India)

info@haindia.com
www.haindia.com

Design by

# ‘प्यार किया तो डरना क्या’




पूर्वी दर गुरुवारी दूरदर्शन वर छायागीतात बऱ्याचदा एक गाणं लागे. गरगर गिरक्या घेणारी मधुबाला, महालाला जडवलेल्या बिलोरी काचांमध्ये तिच्या गिरक्यांची हजारो प्रतिबिंबं आणि लताबाईंचा टिपेचा स्वर.. ‘प्यार किया कोई चोरी नही की.. जब प्यार किया तो डरना क्या’ .. मन रोमांचित होऊन जाई.. लताबाईंच्या स्वराची मोहिनी पडे आणि प्रचंड आश्चर्य वाटे की, असं प्रत्येक आरशामध्ये गिरक्या घेणाऱ्या मधुबाला चं प्रतिबिंब कसं काय दिसतंय. पुढे



चित्रपटाच्या निर्मितीच्या कथा वाचल्यानंतर सगळी रहस्यं उलगडत गेली.

उर्दू नाटककार इम्तियाज अली ताज यांनी १९२२ मध्ये सलीम आणि अनारकली यांच्या प्रेमकथेवर आधारित नाटक लिहिलं ‘अनारकली’. १९४० मध्ये अनारकलीच्या कथेने निर्माता शिराज अली हकीम आणि तरुण दिग्दर्शक के आसिफ यांना मोहिनी घातली. त्यांनी मुघल-ए-आझम या नावाने चित्रपट तयार करायचा ठरवला. अमान, वजाहत मिर्झा, कमाल अमरोही आणि अहसान रिजवी या चार नावाजलेल्या उर्दू लेखकांना पटकथा लिहिण्यासाठी नियुक्त केलं गेलं. त्यांनी आपलं कौशल्य पणाला लावलं. त्यामुळे कथेच्या ओळी ओळीतून काव्य पाझरतं. पात्रांचे संवाद अतिशय उच्च उर्दू - पर्शियन भाषेतील आहेत. बऱ्याचदा आपल्या डोक्यावरून जातात. शेक्सपियर कालीन नाटकाप्रमाणे भरजरी भाषा असलेली ही पटकथा पूर्ण होत आली तेव्हा आसिफने चंद्रमोहन, डि के सप्रू आणि नर्गिस यांना अकबर सलीम आणि अनारकली यांच्या भूमिकेसाठी नक्की केलं. १९४६ मध्ये बॉम्बे टॉकिज स्टुडिओ मध्ये चित्रीकरणाला सुरुवात झाली. पण एक तर आसिफ हा बऱ्यापैकी सर्किट माणूस होता. त्याला आय आणि व्यय यांचं फारसं भान नसे. त्यामुळे नकटीच्या लग्नाला काय येतील अशा आत्यंतिक संकटांचा सामना करावा लागला. १९४७ ची फाळणी आणि दंगे यामुळे फायनान्सर शिराज अली पाकिस्तानात गेला. कलाकार चंद्रमोहन यांना हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू आला. पुढे शापूरजी पालनजी यांनी अकबराच्या इतिहासात रस असल्यामुळे या चित्रपटाला फायनान्स करायचं कबूल केलं. नवीन कलाकार घेऊन चित्रीकरणाला सुरुवात झाली.

अकबर-जोधाबाई भूमिकांसाठी पृथ्वीराज कपूर- दुर्गाबाई खोटे यांची निवड, तर सलीम-अनारकली भूमिकांसाठी त्या काळातील प्रणयी जोडी दिलीप कुमार-मधुबाला यांची निवड झाली. मधुबाला हिला चित्रपटासाठी एक लाख रुपये मानधन मिळालं जे त्या काळातील कुठल्याही कलाकारापेक्षा अधिक होतं. बहार या खलनायिकेच्या भूमिकेसाठी अतिशय सुंदर पण गारगोटी सारखे थंडगार डोळे असलेल्या निगार सुलतना या अभिनेत्री ची निवड झाली.

कथा आपल्याला सर्वांना माहिती आहे. राजपरिवारातील मुख्यत: पिता पुत्रातील संघर्ष, आणि सलीम अनारकली यांच्यातील प्रेमकथा रंगवली आहे. राजा अकबर याला पुत्र संतान नसल्याने तो चिश्ती बाबाच्या दरग्यात चालत जातो. बाबाच्या प्रसादाने त्याला पुत्र रत्न प्राप्त होतं. राणी जोधाबाई ला मुलगा होतो. ही बातमी प्रथम धावत येऊन सांगणाऱ्या दासी ला अतिशय खूष होऊन तो



अंगठी बक्षीस देतो आणि वचन देतो की ती जे काही मागणं मागेल ते तो पूर्ण करेल.. ही अनारकली ची आई. पुढे लेकीला भिंतीत चिणून मारण्याची शिक्षा झाल्यावर राजाला आपल्या वचनाची आठवण करून देते आणि लेकीला घेऊन लाहोर मध्ये निघून जाते... अति लाडांमुळे सलीम उर्फ शेखू हा अतिशय वाया गेलेला असतो. त्याला शिस्त लावण्यासाठी त्याचे वडील युद्धावर पाठवतात. चौदा वर्षानंतर परत आलेला सलीम हा दणकट, देखणा, हाडाचा सैनिक बनलेला असतो. तो दरबारातील नादिरा या नर्तकीच्या प्रेमात पडतो, जिला तिच्या रूपावरून अकबराने ‘अनारकली’ हा खिताब दिलेला असतो. अनारकली म्हणजे डाळिंबाच्या फुलाची कळी.. फुलांच्या बहरासारखं दोघांचं प्रेम बहरून येतं. पण हे लक्षात आल्यावर राजनर्तकी बहार मत्सराने पेटून निघते. राजपुत्र सलीमला प्रेमाच्या जाळ्यात फसवून मुघल साम्राज्ञी बनायचं तिचं स्वप्न धोक्यात येतं. ती सलीम अनारकलीचे प्रेम संबंध राजासमोर उघडे करते. राजा संतापतो. अनारकलीला साखळदंडाने जखडून बंदी करतो. पुढे तिच्या मुक्ततेची ग्वाही देतो आणि सांगतो की, “सलीम ला सांग की, तुझं प्रेम हे नाटक होतं.” अनारकली मुक्तता तर करून घेते, पण साऱ्या दरबारासमोर खुलेआम राजाला सुनावते ‘जब प्यार किया तो क्या..’

लताबाईंच्या स्वर्गीय स्वरातील दरबारी रागातील तानेपासून सुरु होणारं हे गीत राग

पान ८ वर

पान ५ वरून

## मॅट्रिमोनियल सायबर फ्रॉड..

तिच्याशी व्हिडिओ कॉल द्वारे किंवा प्रत्यक्ष भेटण्यास उत्सुक नव्हता. हळूहळू तिला त्याचा संशय येऊन तिने त्याला प्रत्यक्ष भेटण्याचा घाट घातला. त्यानंतर मात्र त्याचा फोन बंद झाला. काही दिवसांनी तिला एक ई-मेल आला त्या ई-मेलमध्ये तिला कळवण्यात आले की, तिच्या




होणार्या नवर्या ला अमली पदार्थाच्या केसमध्ये ऑस्ट्रेलियामध्ये अटक झाला आहे तसेच त्याच्या ऑस्ट्रेलियन वडिलांचे निधन झाले आहे. हे सर्व वाचल्यावर तिची खात्री झाली की आपली फसवणूक झाली आहे. त्या अनुषंगाने तिने ‘रॉयल बँक ऑफ स्कॉटलंडचे’ वेब-पेज व्यवस्थितपणे तपासले असता ते वेब-पेज देखील बनावट असल्याचे आढळून आले. त्यानंतर तिने विलेपारले पोलीस ठाणे येथे येऊन रीतसर तक्रार दाखल केली. हा सर्व प्रकार सुमारे एक वर्षे चालला होता आणि एक वर्षानंतर तिने पोलिसात तक्रार केली त्यामुळे आरोपीचा ठाव ठिकाणाला लागण्याचे किंवा त्यांना पकडण्याचे चान्सेस फार कमी होत गेले.

वरील केस स्टडी मध्ये आपल्या लक्षात आले असेल की सदर महिलेने त्या आरोपीला कधीही प्रत्यक्षात पाहिले नव्हते, ती कधीही त्याला प्रत्यक्षात भेटली नव्हती किंवा तिच्या ’रॉयल बँक ऑफ स्कॉटलंड’ या बँकेच्या खात्यामध्ये जमा झालेली रुपये साडेचार करोड ही रक्कम खरोखरच जमा झाली आहे का ? याची त्यांनी कोणतीही खातरजमा केली नव्हती.

त्यामुळे अशा गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने जनजागृती मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे जेणेकरून भविष्यामध्ये दुसरी कोणतीही महिला अशा प्रकारच्या फसवणुकीला बळी पडणार नाहीत.

A Stitch in Time Saves Nine...



**(अविनाश धर्माधिकारी)**
निवृत पोलीस उपअधीक्षक
महाराष्ट्र पोलीस, मो. न. ९९३०६८५८३१



पान ७ वरून

## 'प्यार किया तो डरना क्या'

दुर्गातून पुढे जातं. उत्तर प्रदेशातील एका लोकगीतावर आधारित आहे. सुरुवातीला राजा अकबरासमोर अदबीने दबुन बोलणारी अनारकली धिटाईने, आत्मविश्वासाने.. 'प्यार किया तो डरना क्या'.. असं विचारते. अकबराच्या हुकुमाला उत्तर म्हणून.. 'इष्क में जीना इष्क में मरना'.. म्हणत सलीमच्या कमरेला खोचलेली कट्यार काढून अकबराच्या पायावर ठेवते. मी प्रेम केलंय.. आता जे परिणाम



होतील ते भोगायला मी तयार आहे..के. आसिफ यांचं दिग्दर्शन आणि लच्छू महाराजांचं नृत्य दिग्दर्शन लाजवाब.

या गाण्याच्या चित्रीकरणासाठी लाहोर किल्ल्यातील शीश महलची प्रतिकृती बनवली गेली. हा सेट त्याच्या भव्यपणासाठी प्रसिद्ध आहे. ४६ मीटर लांब २४ मीटर रुंद आणि ११ मीटर उंच असलेला हा सेट जडवलेल्या बेल्जियम ग्लासच्या छोट्या छोट्या आरशांमुळे चर्चेचा विषय राहिला. फिरोजाबाद येथील कारीगारांकडून तो बनवून घेतला होता. सेट तयार व्हायला दोन वर्षे लागली आणि त्याची किंमत त्या वेळच्या बॉलीवूडमधील चित्रपटाच्या निर्मितीहून अधिक होती. या गाण्याचं चित्रीकरण ही छायाचित्रणकार आर डी माथुर यांच्यासाठी कसोटी होती. शीश महल चा सेट मोठा असल्याकारणाने लाईट साठी पाचशे ट्रक्स चे हेडलाईट्स आणि शंभर रिफ्लेक्टर्स वापरले गेले. पण बिलोरी आरसे उजेडात लखलखत. त्यामुळे चित्रीकरणात अडचण येऊ लागली. पुढे आरशांवर पातळ मेणाचा थर दिला त्यामुळे चमक थोडी कमी झाली. ज्या भागात शूटिंग नसेल तेवढा भाग कापडाने झाकायला सुरुवात केली. ज्यामुळे रिफ्लेक्शन कमी झालं.

या चित्रपटासाठी आसिफ याने सगळं भव्य दिव्य करण्याच्या हव्यासापायी कमालीच्या बाहेर खर्च केला. माखनलाल आणि कंम्पनी यांच्याकडून पोशाख करवून घेतले गेले. दिल्ली आणि सुरत येथील कलाकारांनी जरदोसी भरतकामाने मुघल काळातील पोशाख तयार केले. मोजड्या वगैरे पादत्राणे आग्राहून मागवली होती. ज्वेलरी हैदराबाद येथील सोनारांकडून बनवली गेली होती. मुकुट कोल्हापूरहून बनवले होते. राजस्थानातील लोहारांकडून चिलखते, तलवारी, शिरस्त्राणे इत्यादी शस्त्रास्त्रे बनवून घेतली होती. जोधाबाईच्या पूजेतील कृष्णाची मूर्ती खरीखुरी सोन्याची होती. अनारकलीच्या शरीरावर जखडलेले साखळदंड खरेखुरे होते. अकबर आणि सलीम यांच्यावर चित्रित युद्धामध्ये दोन हजार उंट, चारशे घोडे आणि आठ हजार सैनिक जयपूर येथील 56th रेजिमेंट मधून घेतले होते. राजस्थानात सेट्स उभारले होते. त्यामुळे चित्रीकरणादरम्यान साऱ्या कलाकारांना प्रचंड उष्णतेचा त्रास सहन करावा लागला. मधुबालाला हृदयाची व्याधी होती. त्यात कमालीची उष्णता, जड जड पोशाख, जवाहिर यामुळे तिच्या नाका तोंडातून रक्त वाहत, कित्येकदा ती सेट वर मुर्छीत होऊन पडे. चित्रपट संपता संपता ती आणि दिलीप कुमार यांच्यातील प्रेमसंबंध संपुष्टात येऊन वाद विकोपास गेले होते.

चित्रपटाच्या शूटिंग साठी चौदा कॅमेरे वापरले गेले आणि प्रत्येक सीन तीन वेळा शूट होत असे. त्यामुळे प्रचंड प्रमाणात फिल्म वापरली गेली. शूटिंग संपता संपता ब्लॅक अँड व्हाईट हिंदी चित्रपट सृष्टी रंगीत झाली. असिफ ने ही एक रिळ टेक्निकलर मध्ये शूट करायचा निर्णय घेतला. रिझल्ट्स बघून तो इतका खूष झाला की उरलेली तीन रिळांची फिल्म ही त्याने टेक्कनिकलर मध्ये केली. आता पुन्हा एकदा सगळी फिल्म रंगीत करायचं त्याच्या मनाने घेतलं. पण डिस्ट्रिब्युटर्स खवळले. कारण एकूण नऊ वर्षं आणि अवाच्या सवा खर्च झाला होता. त्यामुळे त्याने फिल्म जशी आहे तशी प्रसिद्ध केली. फिल्म प्रसिद्ध झाली तेव्हा मागे लाखो फूट वापरलेली फिल्म आणि जेवढी गाणी चित्रपटात वापरली गेली, जवळपास तेवढीच गाणी चित्रपटातून काढून टाकलेली.. उरली.

चित्रपटाचं संगीत सुप्रसिद्ध नौशाद यांनी केलं. गीतं शकील बदायुनी यांची. शुद्ध शास्त्रीय संगीतावर आधारित तसंच लोक संगीतावर आधारित अशी दोन्ही प्रकारची गीतं त्यांनी केली. चित्रपटात एकूण बारा गाणी आहेत. जी लता मंगेशकर मोहम्मद रफी आणि शमशाद बेगम यांनी गायलेली आहेत. गाण्यांसाठी भव्य ऑर्केस्ट्रेशन आणि कोरस चा वापर केला आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत प्रथमच सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायक बडे गुलाम अली खान यांच्या दोन बंदिशी आहेत.

५ ऑगस्ट १९६० या दिवशी चित्रपट देशभरात प्रसिद्ध झाला. चित्रपटाचा प्रीमिअर त्यावेळी नवीनच झालेल्या मराठा मंदिर येथे झाला. चित्रपटाची रिळं वाजत गाजत हत्तीवरून आणली गेली. प्यार किया तो डरना क्या.. गाण्याचा सेट, शीश महल, सिनेमागृहात आणून बसवला गेला, जिथे तिकीट काढलेले प्रेक्षक जाऊन स्वत: सेट बघू शकत असत. तिकीटविक्री सुरु झाली तेव्हा जवळपास लाखभराचा जमाव जमला होता आणि तिकिटाची किंमत होती शंभर रुपये. चित्रपटाने सारे उत्पन्नाचे रेकॉर्ड मोडले. नवा उच्चांक स्थापन केला. जो पुढे पंधरा वर्षांनंतर शोले चित्रपटाने मोडला.



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

## श्री. पार्लेश्वर व्यायामशाळेच्या मल्लखांब पट्टूना देदीप्यमान यश!



विश्व मल्लखांब संघटनेतर्फे दिनांक ९ ते ११ मे २०२३ रोजी आसाम येथे दुसऱ्या विश्व मल्लखांब अजिंक्यपद स्पर्धा पार पडल्या. सुमारे दहा देशातील १२० खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धेत श्री. पार्लेश्वर व्यायामशाळेचे मल्लखांब खेळाडू श्री. अक्षय तरळ यांनी वैयक्तिक अजिंक्यपद स्पर्धेमध्ये १०७.२४२ गुणांसह वैयक्तिक अजिंक्यपद पटकावले. तसेच महिलांमध्ये देखील श्री. पार्लेश्वर व्यायामशाळा विलेपार्ले येथील खेळाडू कु. जान्हवी जाधव हिला ८८.०६७ गुणांसह वैयक्तिक अजिंक्यपदाचे सुवर्णपदक मिळाले. श्री. अक्षय तरळ आणि कु. जान्हवी जाधव यांच्या यशात त्या दोघांचे मार्गदर्शक श्री गणेश देवरुखकर यांचा ही मोठा वाटा आहे. सर्व पार्लेकरांतर्फे या संपूर्ण टीमचे हार्दिक अभिनंदन !





## जवान कृतज्ञता दिवस

बुधवार दिनांक १० मे, २०२३ रोजी लोकमान्य सेवा संघ नागरिक दक्षता शाखे तर्फे आयोजित करण्यात आलेला 'जवान कृतज्ञता दिवस' संपन्न झाला.

या कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट कर्नल अजय ओक (निवृत्त) तसेच सन्माननीय वीरमाता अनुराधा गोरे व डॉ. मंजू मंगलप्रभात लोढा हे अतिथी उपस्थित होते.

'आओ फिरसे दीप जलाए' या श्रीमती. अनुराधा गोरे लिखित पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे अजय ओक यांच्या हस्ते झाले. तर, रंगवेद निर्मित आणि संध्या ओक प्रस्तुत 'तेथे कर माझे जुळती ' हा नाट्याविष्कार रसिकांना मंत्रमुग्ध करून गेला. डॉ. मंजू मंगलप्रभात लोढा लिखित व नीला रवींद्र निर्मित 'आईए हम सब याद करें । अपने वीर जवानोंको ।' या ध्वनिमुद्रित गीताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागरिक दक्षता शाखेच्या कार्यवाह मेघना किंजवडेकर यांनी केले.











# विसरलेले समाज - १ : नाझ्का

देशोदेशी

आज ‘लुप्त झालेले प्राचीन समाज किंवा संस्कृती’, असं म्हटल्यावर चटकन डोळ्यापुढे ३-४ ठराविक नावं येतात - हडप्पा, धोलाविरा इ. भोवतालची सिंधू संस्कृती किंवा प्राचीन इजिप्त अथवा मेसोपोटेमिया (सुमेर, बाबिलॉन इ.). मी मुद्दामच ह्या यादीत भारतीय आणि चिनी संस्कृतीचं नाव घेतलं नाही कारण जरी दोन्ही प्राचीन असल्या आणि त्यांच्या स्वरूपात काळाच्या ओघात जमीन-अस्मानाचा बदल झाला असला तरी दोन्ही संस्कृती अजून जिवंतच आहेत.

माझ्या दुनियाभराच्या भटकंतीत, अनेक, तुलनेने अप्रसिद्ध अश्या प्राचीन समाजांचे चकित करणारे अवशेष समोर आले. त्यातील काही समाज उगम-समृद्धी-विनाश अश्या नैसर्गिक चक्रात लुप्त झाले असतील, तर काही एखाद्या दुर्दैवी उत्पातात उध्वस्त झाले असतील. परंतु अगदी आधुनिक काळापर्यंत, ते संपूर्णपणे विस्मृतीच्या पडद्याआड गेले होते आणि गेल्या केवळ एक-दोन शतकांमध्येच पुरातत्व शास्त्रज्ञांच्या प्रयासांमुळे पुन्हा एकदा ते जगासमोर आले. आजही त्यांच्याबद्दल सांगोपांग माहिती मिळाली आहे असं नाही. त्यांनी मागे ठेवलेल्या अवशेषांवरून ते समाज आणि त्यांचे सभासद कसे दिसत असतील, कसे राहत असतील, काय भाषा बोलत असतील, त्यांची समाजव्यवस्था आणि राजकीय यंत्रणा कशी असेल, धार्मिक आचार-विचार काय असतील ह्याबद्दल फक्त कल्पनाच आपण करू शकतो.

ह्या मालिकेतल्या पहिल्या लेखात आपण जाणार आहोत पेरू मध्ये नाझ्का शहराजवळील वैराण प्रदेशात. नाझ्का आज जगप्रसिद्ध आहे ते १५००-२००० वर्षांपूर्वी त्यांनी रेखाटलेल्या कातळ-चित्रांसाठी. वाळवंटात मैलोनमैल पसरलेली चित्र काही तर इतकी विस्तृत आहेत की त्यांची पूर्ण कल्पना फक्त विमानात बसून १००० फूट उंचावर गेल्यावरच येऊ शकते. **पहा पहिले दोन फोटो.** मात्र ही कातळ-चित्रं




आश्चर्याने तोंडात बोट घालायला लावणारी असली तरी, ज्या समाजाची ती मागे राहिलेली खूण आहे त्यांच्या बद्दल उपलब्ध माहिती आजही फारच तुटपुंजी आहे.

हा नाझ्का समाज बहरला पेरूतील आजच्या पराकास आणि नाझ्का ह्या शहरांमधील वैराण भागात **(पहा तिसरा फोटो -** नाझ्का नदीच्या






खोऱ्याचा) ख्रिस्तपूर्व १००-२०० ते ख्रिस्तोत्तर ७००-८०० ह्या सुमारे आठ-नऊ शतकांमध्ये. त्यांच्या सामाजिक/सांस्कृतिक वैशिष्ठ्यांबद्दल आज आपण फक्त थोडाफार अंदाजच करु शकतो - त्यांची अजून अस्तित्वात राहिलेली भांडी-कुंडी, कापड-चोपड, कबरस्थानं आणि अर्थातच कातळ-चित्रं यांन वरून. त्यांनी स्वत: बद्दल एक अक्षरही लिहून ठेवलेलं नाही. किंबहुना त्यांना कुठल्याही स्वरूपात लेखन कला अवगत होती असं वाटत नाही.

पण उपलब्ध अवशेषांवरून असं दिसतं कि, या समाजाची दोन प्रमुख केंद्रं होती. काहुआची (Cahuachi) हे अध्यात्मिक केंद्र तर व्हेंटिला (Ventilla) हे नागरी व्यवहाराचं केंद्र. अर्थात व्हेंटिला जरी नागरी केंद्र असलं तरी ते राजकीय सत्ता-केंद्रही होतं असं मात्र ठामपणे म्हणता येणार नाही. कारण नाझ्का नदीचं खोरं, पिस्को खोरं आणि अकारी खोरं ह्या विभागात पसरलेला हा समाज जरी एकाच सामायिक संस्कृतीने बांधला गेला असला तरी, तो अनेक स्थानिक नेते आणि त्यांचे अनुयायी यामध्ये राजकीय दृष्ट्या विखुरलेला असावा.

निर्जल वाळवंटी प्रदेशात वसलेला असल्यामुळे पाणी आणि शेती उत्पादन हा त्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न होता. काहुआची हे त्यांचं धार्मिक उत्सव साजरे करण्याचं प्रमुख तीर्थस्थान बनण्याचं कारणही तिथे असलेलं पाण्याचं वैपुल्य हेच असावं. काहुआचीच्या परिसरात (सुमारे २५०० एकर क्षेत्रात) आढळलेले ४०-४५ ढिगारे त्यामध्ये मिळालेल्या अवशेषांवरून जेथे धार्मिक कर्मकांडं केली जात अश्या देवळांस्वरूप असावेत आणि एकूणच काहुआचीची व्याप्ती आणि नाझ्कांच्या अंदाजी लोकसंख्येची तुलना केली असता, बहुसंख्य नागरिक दूर दूरच्या वस्त्यांवरूनही काहुआचीला दर वर्षी सुगीच्या हंगामात धार्मिक उत्सव साजरा करण्यासाठी येत असावेत असं म्हणता येईल.

नक्की ह्या उत्सवाचं स्वरूप काय होतं ते जरी सांगता येत नसलं तरी भांड्या-कुंड्यावर रेखाटलेल्या चित्रांवरून निसर्गपूजा त्यांच्या धार्मिक विचार आणि विधींच्या केंद्रस्थानी असावी. देवतांना बळी प्रदान करण्याची प्रथाही प्रचलित असावी - फक्त लामा किंवा गिनि पिग सारखे प्राणीच नव्हे तर माणसे सुद्धा. **पहा चौथा फोटो,** नाझ्का अवशेषांमध्ये मिळालेल्या एका



भित्ती-चित्राचा. इतकंच नव्हे तर मानवी कवट्यांच्या माळा त्यांच्या देवतांना वाहायची पद्धत होती असंही म्हणायला जागा आहे. कारण उत्खननात सापडलेल्या भांडयावरच्या चित्रात तसे देखावे आहेत. आणि अनेक पूजास्थानी कपाळावर मध्यभागी भोकं पाडलेल्या कवट्या आणि कित्येक थडग्यांमध्ये शिरविरहित प्रेतंही पुरलेली आढळली आहेत. असो, त्यांच्या प्रसिद्ध कातळ-चित्रांखेरीज आणखी तीन गोष्टी चकित करणाऱ्या आहेत.

एक - पाण्याचं दुर्भिक्ष असलेल्या प्रदेशात जमिनीखालील खोलवरच्या झऱ्यांचं पाणी दूर पर्यंत खेळविण्यासाठी केलेली कालव्यांची यंत्रणा. त्यांचा कालखंड लक्षात घेता ह्या यंत्रणेची संकल्पना, रचना, व्याप्ती आणि कार्यक्षमता आश्चर्य वाटावी अशी आहे.

दोन - त्यांची विणकामातील प्रगल्भता. कापूस, लोकर, पक्षांची पिसं अश्या विविध गोष्टी वापरून केलेली विस्तृत आकाराची कापडं, शवाच्छादने, अंगरखे इत्यादी आणि त्यावरील ६ ते १० रंगात विणून किंवा भरतकाम करून चितारलेली गुंतागुंतीची चित्रं आणि आकृतिबंध, त्यांच्या कलाकौशल्याची साक्ष आहेत. **पहा पाचवा फोटो -** थडग्यातील शवावर



पांघरलेल्या चादरीचा.

तीन - पॉटरी : रोजच्या वापरातील आणि धार्मिक कर्मकांडात वापरण्याची मातीची भांडी. मातीची भांडी रंगीत चित्रांनी सजवायची सोपी पद्धत म्हणजे, भांडं भट्टीत भाजून काढल्यावर, त्या वर चित्रे रेखाटणे. मात्र कच्च्या मातीच्या भांड्यावर प्रथम विविध रंगी (१२ ते १४ वेगवेगळे रंग) चित्रं रेखाटायची. नंतर ती भट्टीत भाजून काढायची. ह्या भाजण्याच्या प्रक्रियेत ती चित्रं आणि त्यांचे रंग नुसते अबाधितच ठेवायचे नाही तर त्यांना अधिक झिलई आणायची, ही उच्च दर्जाची कलाही त्यांनी विकसित केली होती. **पहा सहावा आणि सातवा फोटो.**





नाझ्कांच्या ह्या अवशेषांत सर्वात वादग्रस्त गोष्ट आहे अर्थातच त्यांची कातळ-चित्रं! नाझ्का वाळवंटाचा पृष्ठभाग दोन थरांत आहे. एका अरुंद (५० ते १०० से.मी. रुंद) रेषेत जर सर्वात वरच्या थरातले लाल खडे काढून टाकले, तर त्या खालील थरातील फिक्या पिवळट रंगाच्या माती-वाळूमुळे नजरेत भरणारी रेषा आपोआप तयार होते. नाझ्का लाईन्स नावाने प्रसिद्ध झालेली ही चित्रं हेच साधं तंत्र वापरून चितारण्यात आली आहेत. आणि ती इथे पाऊस जवळजवळ पडतच नसल्यामुळे आज १५०० वर्षांनंतरही मूळ स्वरूपात पाहायला मिळतात. त्यातील काही चित्रे एवढी प्रचंड आहेत की जमिनीवर उभं राहून ते संपूर्ण चित्रं काय असेल ह्याचा अंदाज करता येत नाही. उदाहरणार्थ वरील फोटोंपैकी Condor पक्ष्याचं चित्र १३० मी (४२५ फूट) लांब आणि ११५ मी. (३७५ फूट) रुंद आहे!

ते पूर्णपणे पाहण्यासाठी जमिनीपासून ८००-१००० फूट उंचीवर जावं लागतं. त्यामुळेच ह्या चित्रांभोवती अनेक अतिरंजित कथा रचल्या गेल्या. वास्तव हे आहे की ही चित्रं नक्की का काढली गेली ह्या बद्दल काहीही ठोस पुरावा आज तरी उपलब्ध नाही. परंतु नाझ्कांच्या धर्माशी त्यांचा संबंध असावा असं म्हणायला जागा आहे. एक तर त्यांच्या निसर्गपूजेत वापरल्या जाणाऱ्या

पान १० वर

पान ९ वरून

## विसरलेले समाज - १ : नाझका

अनेक आकृती येथे दिसतात. उदाहरणार्थ Condor पक्षी किंवा देवमासा. दुसरं म्हणजे ह्यातील कित्येक आकृतींच्या आजूबाजूला काहुआची सारख्या जागी धार्मिक विधींमध्ये वापरल्या जाणाऱ्या भांड्यांचे अवशेषही सापडले आहेत.


मी पराकास, नाझका येथे २०१९ च्या मे महिन्यात भेट दिली. जाण्याआधी तेथे कातळ-चित्रांखेरीज इतर काही पाहण्या-अनुभवण्यासारखं असेल ह्याची मला अजिबात कल्पना नव्हती. माझे डोळे उघडले प्रथम लिमा (पेरू देशाची राजधानी) येथील लार्को म्युझियम पाहिल्यावर. लार्को म्युझियममध्ये नाझकांसहित पेरूतील अनेक प्राचीन संस्कृतींचे अवशेष - पॉटरी, कापड, चित्रं, पुतळे, दागिने बघायला मिळतात, त्यातून प्रतीत होणारी प्राचीन कला, तंत्रज्ञान आणि समाज-जीवन आश्चर्याने थक्क करणार आहे.

ह्या लेखात नाझकांच्या सर्वच वैशिष्ट्यांचं तपशीलवार वर्णन करणं शक्य नाही. परंतु त्यांच्याबद्दल अधिक माहिती करून घ्यायची असेल तर, ज्या तीन निबंधांचा मी ह्या लेखासाठी मुख्यत: आधार घेतला, त्यांच्या ऑनलाईन लिंक्स लेखाच्या शेवटी दिल्या आहेत.

मात्र जाताजाता नाझकांचं एक वैशिष्ट्य सांगितल्या शिवाय राहवत नाही. आपल्या पर्यावरणाचा आपल्याच हाताने विनाश करून उध्वस्त झालेला इतिहासाला माहीत असलेला हा सर्वात जुना समाज असेल. उपलब्ध खुणांवरून असं वाटतं की जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्यासाठी त्यांनी ह्या प्रदेशात सर्वत्र पसरलेल्या हुरांगो (Huarango - Prosopis pallida) झुडुपांच्या अरण्याचा नाश केला. त्यामुळे आठव्या शतकात अकस्मात (El Nino ह्या वातावरणातील बदलांमुळे) जेंव्हा अतिवृष्टी आणि पूर आले तेंव्हा ह्या अरण्याअभावी नाझकांच्या संपूर्ण प्रदेशाची धूप होऊन वाताहत झाली आणि हा संपूर्ण समाजच पुढच्या काही दशकांत कोलमडला.

अर्थात इतिहासात अशी पर्यावरणाच्या विनाशाची अनेक उदाहरणं असली तरी आपल्या आजूबाजूची परिस्थिती पाहता, त्यावरून आपण काही शिकलो असं काही म्हणता येणार नाही!

संदर्भ:
https://people.umass.edu/proulx/online_pubs/Nasca_Overview_Zurich.pdf
https://people.umass.edu/proulx/online_pubs/Nasca_Headhunting_Zurich.pdf
https://people.umass.edu/proulx/online_pubs/Nasca_Ceramic_Iconography_Overview.pdf



सतीश जोशी
९८२०२२८२७९

## आफ्रिकेच्या छताला पार्लेकराची गवसणी

कॉम्प्युटर, कोडींग आणि कविता यात रमणाऱ्या शैलेश देशपांडेला किलीमांजारो सारख्या आफ्रिकेतल्या या सर्वोच्च पर्वतावर चढाई करायचे साहस प्रत्यक्षात सुचेल हे




स्वप्नातही वाटलं नव्हतं.

१९,३४१ फूट अर्था ५,८४५ मीटर एवढी या किलीमांजारो पर्वताची उंची आहे म्हणजे ह्या पर्वतराजीचं टोक हे एव्हरेस्ट बेस कॅम्प पेक्षाही अधिक उंचीवर आहे. या शिवाय ऑक्सिजन अतिशय विरळ आणि चढाई खडतर आहे.

किलीमांजारो ट्रेक हा लिमोशो राऊट, मचामे राऊट, कोकाकोला राऊट अशा ७ वेगवेगळ्या वाटेने करता येतो. शैलेश देशपांडेने यांने निवडलेला मचामे राऊट हा सात दिवसाचा असून प्रत्येक दिवशी सात ते दहा किलोमीटर चालावे लागायचे आणि दर दिवशी वरच्या अल्टिट्यूड वर नवीन कॅम्प लागत असे. त्या १४ लोकांबरोबर असणारा जवळजवळ ५० लोकांचा तांझानिया मधला सपोर्ट स्टाफ हा भयंकर एनर्जेटिक आणि खेळकर होता. दर दिवशी कॅम्पवर पोचल्यावर ते वेगवेगळी स्वाहिली भाषेतील गाणी म्हणून कंपूचे मनोधैर्य उंचावत असत. पहिल्या दोन दिवसात शैलेशची ऑक्सिजन लेव्हल ९० आणि ८६ अशी खाली जायला लागली परंतु तिसऱ्या दिवशी पंधरा हजार फुटावरुन खाली येऊन १३००० फुटावर राहिल्यामुळे त्याची ऑक्सिजन लेव्हल परत ९६ वर पोहोचली. वाढलेली ऑक्सिजन लेव्हल जणू सांगत होती की त्याची प्रकृती आता हाय अल्टिट्यूटला स्थिरावत आहे आणि शैलेशला जरा हायसं वाटलं.



बघता बघता किलीमांजारोचं टोक म्हणजे स्टेला पॉईंट आणि उहूरू पिक आता टप्प्यात आलं होतं. पण त्यासाठी शैलेश ला करायचा होता तो ३६ तासाचा अवघड प्रवास, त्याच्या आयुष्यामधली ही सर्वात खडतर वाट.. समिट डे च्या दिवशी त्याचा कंपू सकाळी आठ वाजता करंगा हट्स कॅम्प मधून निघाला आणि ४ तासात बराफू कॅम्प ला जवळजवळ बारा वाजता पोहोचला. साडे पंधरा हजार फुटावर हा कॅम्प असल्यामुळे हवा अतिशय विरळ झाली होती, जेवणही फार जास्त जात नव्हतं. अशा परिस्थितीत कसंबसं थोडसं जेवून शैलेशसह सगळेच दुपारी आराम करण्यासाठी पडले कारण पुढील टोकापर्यंतची चढाई ही रात्री अकरा वाजता चालू होणार होती. ते तयारी करत असतानाच अचानक संध्याकाळी ७ च्या सुमारास अतिशय मोठ्या प्रमाणात हिमवृष्टी झाली आणि सर्व मनातून टरकले. मनात एक शंकेची पाल चुकचुकून गेली की इथवर येऊन आता वर टोकापर्यंत जाता येतं की नाही? परंतु त्यांच्या सुदैवाने बर्फदृष्टी थांबली आणि त्यांना अगदी वेळेवर अकरा वाजता चढाईला परत सुरवात करता आली. रात्रीच्या वेळी सर्व लोकांनी त्यांच्या डोक्यावर हेड टॉर्च लावले होते. हा खडतर प्रवास असल्यामुळे त्या १४ लोकांच्या बरोबर नऊ गाईड होते. स्वाईली भाषेत ते गाईड त्यांना पोले पोले असं सांगत होते अर्थातच एकदम हळूहळू चाला. (आणि मुखाने गजानन बोला हे सर्वांचे मनात चालूच होतं) सात तासांच्या अथक परिश्रमानंतर आणि मायनस ३० डिग्री सेंटीग्रेड मध्ये अंगावर तीन ते चार कपड्यांचे लेयर, आजूबाजूला बर्फ आणि सभोवती वाहणारा प्रचंड घोंगावणारा वारा यातून वाट काढत किलीमांजारोच्या टोकावर पोहोचल्यानंतर झालेल्या उत्कट आनंदाचे वर्णन शैलेशला करता येणे शक्य झाले नाही. अ टू माईलस्टोन टू रिमेंबर अँड बकेट लिस्ट आयटम



चेकड ऑफ!

उहूरू पिकला(स्वाहिली भाषेत स्वातंत्र्य) पोचल्यानंतरचा नजारा फारच विलक्षण होता. एक तर १९ हजार फुटाच्या वरती सगळे होते आणि सूर्य नुकताच उगवला होता. आफ्रिकेतील सर्वात उंच पॉईंटला असल्यामुळे सभोवती नजर फिरवल्यावर फक्त क्षितिजच दिसत होतं. समुद्रसपाटीला असताना जे क्षितिज आपल्याला एक सरळ रेषेत दिसतं ते त्या उंचीमुळे वक्राकार दिसत होतं. वरती असणारं ते मायनस तापमान, सभोवती असणारा बर्फ आणि ज्वालामुखीच्या क्रेटरच्या भोवती असणारा तो मातीचा रंग असं सगळं एकत्रित बघताना शैलेशला जणू परग्रहावर आहोत असाच भास होत होता.

त्याचा पर्वत भ्रमंतीचा प्रवास जरी संपला असला तरी तिथे त्याने जमवलेल्या आठवणी, नवीन बनलेले तांझानियातले मित्र आणि अजून पर्यंत कधीही न अनुभवलेलं असं निसर्ग सौंदर्य शैलेशसोबत आयुष्यभर राहणार होतं. आणि तसेच शैलेश च्या हृदयात गुंजणार होतं ते...काहीही न कळता सुद्धा स्वाहिली भाषेत त्याच्या सपोर्ट स्टाफ बरोबर गायलेले हे गाणं..

जाम्बो, जाम्बो ब्वाना, हाभारी सानी, झुरी साना वगैनी, मक्वारी बिश्वा,किलीमांजारो, हाकुना मटाटा

## दीपाली कामत अगरवाल यांना सर्वोत्कृष्ट गायिकेचा पुरस्कार

संगीताचा वारसा लाभलेल्या आणि शास्त्रीय गायनाचे शिक्षण पूर्ण करून आपला संसार व करिअर यांची सांगड घालत विविध पुरस्कारांच्या मानकरी ठरलेल्या आजच्या




पिढीतील यशस्वी गायिका म्हणजेच सौ. दीपाली कामत अगरवाल.

नुकतेच त्यांना प्रतिष्ठित 'Rangoli Awards 2023' मध्ये 'सर्वोत्कृष्ट गायिका' म्हणून सन्मानित केले गेले. हा पुरस्कार UNIMO(Universe of Mom's) या संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रदान केला गेला. दीपाली यांच्या संगीतातील योगदानाबद्दल UNIMO (World 's Largest community of mothers) ने विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या ३१



महिलांमध्ये त्यांची निवड केली..त्यांच्या पुरस्काराचे नाव 'Mompreneur in the field of singing' असे आहे.

दीपाली 'Swardeep music Academy ' या संस्थेच्या संस्थापक आणि संचालक आहेत. त्या स्वत: हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत व हिंदी चित्रपट संगीताचे शिक्षण त्यांच्या संस्थेच्या विलेपार्ले (पूर्व) आणि अंधेरी (पूर्व) येथील शाखांमधून तसेच ऑनलाईन माध्यमातून देतात. आतापर्यंत त्यांनी ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही माध्यमातून संपूर्ण जगभरातून तब्बल १५०० विद्यार्थ्यांना संगीताचे धडे दिले आहेत. त्यांच्या या संस्थेने यावर्षी १० वर्षे पूर्ण केली. दीपाली यांच्या संगीताच्या सुरांनी जोडलेले 'स्वरदीप' हे कुटुंब उत्तरोत्तर नक्कीच विस्तारत जाईल याबद्दल तिळमात्रही शंका नाही.

## ‘म्हंजे काय गं आज्जी ?’ चे प्रकाशन

‘शब्द एक अर्थ अनेक’ ह्या संकल्पनेवर आधारित सहज सोपे संवाद असलेल्या सचित्र पुस्तकाचा प्रकाशन सोहळा विलेपार्ले येथील केशवराव घैसास सभागृहात मंगळवार दिनांक २ मे २०२३ रोजी संपन्न झाला.

अल्पावधीतच व्हॉटसॅप-फेसबुक सारख्या समाजमाध्यमांमध्ये लेखनाला भरपूर प्रतिसाद मिळालेल्या सौ. अनुजा बर्वे यांच्या नव्या पुस्तकाचं नाव आहे ‘म्हंज्ये काय गं आज्जी’ ?

माननीय माधवीताई कुंटे अध्यक्षपदी असलेल्या आणि माननीय अनुराधाताई गोरे प्रमुख पाहुण्या




लाभलेल्या या सोहळ्याला मंजिरी देवरस आणि माधुरी घारपुरे यांच्या अभिवाचनाने रंगत आणली. चित्रकार अनीश दाते यांनी सचित्र प्रेझेंटेशन देऊन पुस्तकाची सुंदर झलक सादर केली. या सोहळ्यात इंकिंग इनोव्हेशन्सचे सर्वेसर्वा आनंद लिमये हे देखिल समक्ष सहभागी झाले होते.

‘शब्दांना पुस्तकरूपात बांधायचं नि अर्थाना मोकळं सोडायचं’

हा अनुजा बर्वे ह्यांचा एक मानस पूर्ण झाला. रोहिनची ‘प्रश्नचेंडू षटकं’ आणि आज्जीची ‘चौफेर फलंदाजी’ आता तुमच्या हातात.कोणतंही पान उघडावं नि खुशाल ‘मराठीची-गंमत’ अनुभवावी. नातवंडं, म्हणजे ‘दुधावरची साय’ जरी आताशा ‘इंग्लिश मिडियमी’ असली तरी काय झालं ?

‘निखळ आनंददायी’ अशी आपल्या मराठीतली ‘शब्द-गंमत’ शेअर करण्यासाठी ‘सुंदर-समर्पक’ पुस्तक आता तुमच्यासाठी उपलब्ध आहे.

मराठी भाषेतली ‘शब्द एक अर्थ अनेक’ वाली गंमत पोचवणे आणि आज्जी - नातवंडांमधल्या संवादातला निखळ आनंद पोचवणे ह्यासाठी ह्या पुस्तकाच्या निर्मितीचा खर्च सौ. व श्री. अविनाश बर्वे ह्यांनी स्वखुशीने केला आहे.

आणि...... पुस्तक विक्रीतून येणारी पूर्ण रक्कम ‘कॅन्सर रिसर्चसाठी’ डोनेट करायचा उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे.

सवलतीच्या दरातली पुस्तकाची किंमत रू.२५०/- आणि स्पीड पोस्टने पाठवतांना रू.२८०/-आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी आणि निखळ आनंदाचा लाभ घेण्यासाठी समस्त पार्लेकर उत्तम प्रतिसाद देतीलच.

## पार्ले युवा चक्षक सोहळा संपन्न!

युवासेना विलेपार्ले आणि जॉली स्पोर्ट्स क्लब आयोजित मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने युवासेना सचिव श्री वरुण सरदेसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत पार्ले युवा चषकाचा अंतिम सोहळा जल्लोषात पार पडला.



आठव्या पार्ले युवा चषक २०२३ चे मानकरी खालीलप्रमाणे :

**कुमार गट : प्रथम पारितोषिक पार्ले स्पोर्ट्स क्लब व द्वितीय पारितोषिक अष्टविनायक स्पोर्ट्स क्लब (दहिसर)**



**द्वितीय श्रेणी : प्रथम पारितोषिक सिध्दार्थ संघ (मुलुंड) आणि द्वितीय पारितोषिक दत्तगुरु क्रीडा मंडळ (मालाड)**

## सायली वेलणकर यांना मुंबई इंटरप्रेनर पुरस्कार




१४ एप्रिल, २०२३ रोजी मुंबई इंटरप्रेनर पुरस्कार २०२२ सोहळा ‘सहारा स्टार’ मध्ये पार पडला. पाच ख्यातनाम परीक्षकांनी (ज्युरींनी) निवडक मानांकनांतून १५ पुरस्कार विजेते निवडले होते. आर्थिक गुंतवणुकीच्या कामात लक्षणीय कामगिरी केल्याबद्दल सौ. सायली वेलणकर, सीइओ, वेल्थनेस ह्यांना मुंबई इंटरप्रेनर पुरस्कार २०२२ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार स्वीकारताना सायली वेलणकर यांनी सीए. प्रसाद वेलणकरांना त्यांचे प्रेरणास्थान म्हणून गौरविले. या पुरस्कारांचे आयोजन युग्मा व्हेंचर आणि नोव्हा रिअलटाईम सोल्युशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने झाले. बिसनेस इकॉनॉमिक्स मॅगझिननेही ह्या अवॉर्ड्स ची दखल घेत आपल्या नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या एडिशन मध्ये याची नोंद घेतली.

## पार्ले टिळक विद्यालयातील सुवर्ण स्मृती सोहळा!

गेले अनेक दिवस गाजत असलेला आणि देश विदेशात उत्सुकता असलेला असा पार्ले टिळक विद्यालय इयत्ता ११ वी १९७३ बॅचचा सुवर्ण महोत्सवी सोहळा नुकताच दि. २३ एप्रिल,



२०२३ रोजी शाळेच्या इंग्रजी माध्यम इमारतीच्या सभागृहात संपन्न झाला.एकशे चाळीस एवढ्या प्रचंड उपस्थितीने रंगलेल्या या दिमाखदार सोहळ्याचे पडसाद, अजूनही समाज माध्यमांवर गाजत आहेत.



पारंपारिक वेशभूषेत, पारंपारिक रीतीने केलेले स्वागत रांगोळी, पणत्या, फुलांच्या कमानी यांनी प्रवेशद्वारापाशीच अभ्यागत भारावून जात होते. व्यासपीठावर शाळेच्या इमारतीची छबि असलेला पडदा, वेळोवेळेची शाळेची रूपे दर्शविणारी छायाचित्रे लावण्यात आलेला ध्वनिक्षेपक कट्टा, सेल्फी पॉईंट्स या साऱ्यामुळे तर वातावरण भारून गेले होतेच, त्यातच १९७३ मध्ये काढलेले विद्यार्थ्यांचे फोटो आनंदात भर घालत होते.



शाळा भरतानाची वाजलेली घंटा, तेव्हाच्या प्रथेप्रमाणे लावण्यात आलेली ध्वनिमुद्रिका, शाळा सुरू होतानाची प्रार्थना, काळाच्या पडद्याआड गेलेल्या गुरुजन- विद्यार्थी मित्र यांचे




स्मरण, स्वागत विविध गुण दर्शन आणि सरतेशेवटी एकसुराने, गायलेले राष्ट्रगीत कार्यक्रम उत्तरोत्तर रंगतच गेला !

सुग्रास - स्वादिष्ट नाश्ता, आमरस पुरीचे जेवण, थंडगार केशरी पन्हे आणि काहिली शमविणारे



गुलाबजाम आईसक्रीम याशिवाय रसना ...तृप्तीसाठी आणिक काय हवे ?

त्यानंतर या ५० वर्षात शाळेचे बदललेले रूप, नव्याने निर्माण केलेली दालने - हे सर्व प्रत्यक्ष पाहून शाळेचे ५० वर्षापूर्वीचे विद्यार्थी अतिशय भारावून गेले.

सर्व उपस्थितांना सुवर्ण महोत्सवी सन्मान ,स्मृती चिन्ह मनात रेंगाळणाऱ्या शाळेच्या जुन्या इमारतीचे चित्र असलेल्या शुभेच्छा कार्ड, आवळे, चिंचा बोरांचा शाळकरी खाऊ, साताऱ्याचा ताजा कंदी पेढा इ. देऊन पार्ले टिळक शाळेबद्दल असलेल्या मधुर स्मृती सदैव जपल्या राहोत, अशा शुभेच्छा एकमेकांसाठी व्यक्त करत फोटोमध्ये आपल्या भेटीबंदिस्त करत , उपस्थितांनी एकमेकांचा निरोप घेतला. एक उत्तम आयोजनाच्या सहाय्याने , एक उत्तम कार्यक्रम अनुभवला असाच भाव सर्वांनी व्यक्त केला.

पान २ वरून

## जिद्दी व मेहनती व्यावसायिकाची गोष्ट

व सीसी घेतो. त्यामुळे पुर्नविकास धोक्यात येत नाही. आपल्या असेट्स पेक्षा आपली लायबिलिटी मोठी होता कामा नये. हे तत्व व्यवसायात व व्यक्तिगत जीवनात पाळलेच पाहिजे. त्यामुळेच आज ’अथर्व’वर कोणतेही कर्ज नाही. याचा सचिन यांना अभिमान आहे.

या सर्वात सचिन यांना साथ दिली प्रथम त्यांच्या आई सुरेखा, वडिल तसेच मोठी बहीण सौ. सिद्धिका राऊळ, भाऊ निलेश गुंजाळ, तसेच धर्मपत्नी सौ. साक्षी यांनी. साक्षींनी घर सांभाळले म्हणून सचिन बाहेरच्यांना घर देऊ शकले. त्यामुळे त्यांना साक्षीचे विशेष कौतुक वाटते . फुटबॉलची आवड असलेला मुलगा अथर्व आज अमेरिकेत शिक्षण घेतो आहे, तर मुलगी गौरी शालेय शिक्षणात व्यस्त आहे. एका सामान्य कुटुंबातील व शिक्षणातील मुलगा जिद्दीने केवढी मोठी झेप घेऊ शकतो हे पार्लेकरांसमोर जिवंत उदाहरण आहे.



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०


## कवितेची गोष्ट मिलनक्षेत्र (कविवर्य बा. भ. बोरकर)

राधाकृष्णाची अनोखी, अमर प्रेमकहाणी भारतीय संस्कृतीला व्यापून दशांगुळं उरली आहे. मराठी वांङ्मयात, खास करून काव्यात तर याचा प्रत्यय वारंवार येतो. मागील अंकातील ‘कवितेच्या गोष्टीत ’ वरवर पाहता साध्या निसर्ग चित्राची कविता वाटावी अशा बालकविंच्या ’औदुंबर’ कवितेत गुंफलेला या प्रेमकहाणीचा अदभूत अन्वयार्थ मी मांडला होता. आजच्या कवितेची गोष्टच मुळी राधा कृष्णाच्या मिलनाची आहे. पण असं अनोखं मिलन केवळ ’बाकीबाब’ च कल्पू शकतात.

यमुनाकाठची प्रखर, झळाळणारी दुपार म्हणजेच गौरांगना राधा आणि त्यानंतर सहजपणे संध्याकाळ होताना चोर पावलाने येणारा काळोख म्हणजे राधेच्या अटळ ओढीने येणारा घनश्याम श्रीकृष्ण.

एकदा का या प्रतिमा लक्षात घेतल्या की त्या ओघाने येणाऱ्या या प्रेम कहाणीच्या शब्दचित्रांत आपण गुंगून जातो. या काव्यातील दृश्यात्मकता (visuals) आपल्याला थक्क करते. आणि ती आपल्या समोर उभी करताना कवीश्रेष्ठ बोरकरांच्या शब्द योजने बद्दल काय बोलायचं ? निव्वळ अप्रतिम.

गतिमंद, गोविंद, कंचुकीबंध, रतिगंध, कृष्ण, उष्ण, सतृष्ण, नेत्र, क्षेत्र अशा मधुर शब्दांची लोभस यमकं या काव्याला एका वेगळ्याच उंचीवर नेतात . या काव्याच्या कल्पनेच्या उत्तुंग भरारीला तोडीस तोड साथ देतात. लहान बाळाला आई ज्या सहजतेने जोजवते त्या सहजतेने हे शब्द या अफलातून कल्पनेला पेलतात, गोंजारतात. आणि म्हणूनच यातील एकही शब्द उपरा वाटत नाही की कृत्रिम.


मीलनक्षेत्र

संध्या राधा तांबुस गौरी उन्मादद गतिमंद
यमुना- स्नाना धावत आली जपत मनी गोविंद

न सहुनि मोहनदाह सोडिता श्वास कंचुकी बंध
सहज तिच्या [illegible] सुटले वाळ्याचे रतिगंध

अंचल उडतां कंपित स्तनित चंचल पवन- कदंब
घर्मजलाने सचैल भिजला झाला ओलचिंब

यमुना वदली, "नको राधिके उघडी टाकू पाठ
लोचन पापी सोडवु दे मज कचभाराची गांठ."

हरिप्रतिबिंबे लहरत होती यमुना उदक तुडुंब
डुंबत होती धुंद राधिका पिळीत पिवळे लिंब

वंशवनांतुन व्यंकटलोचन तिमिर चोरटा कृष्ण
उष्ण उसासे टाकित खिळला बघत तिला सतृष्ण


निळी होऊन उठली राधा पिळू लागली केश
मोर होऊनी गिळू लागला जलमौक्तिक हृषिकेश

पिसापिसांतुन फुटू लागले नक्षत्रांचे नेत्र
या चित्राने रास जाहली अक्षय मीलन-क्षेत्र

यातील एकही शब्द किंवा त्याची जागा बदलली जाऊ शकत नाही इतकी ती वीण घट्ट आहे.

कविता वाचत असताना एकाच वेळी यमुनाकाठच्या निसर्गाचा खेळ व राधाकृष्णाचा त्यांच्या या नेहमीच्या संकेत स्थळावरील प्रणयखेळ हे दोन्हीही डोळ्यासमोर येतात. मनी गोविंद जपत आलेली, मोहन दाह असह्य झालेली तप्त दुपार ( प्रेमज्वर दग्ध राधा ) ही पुढं अपरिहार्यपणे येणाऱ्या संध्याकाळच्या शीतल तिमिराची ( घनश्याम श्रीकृष्णाची ) वाट पाहतेय. आपला मदन ज्वर कमी करण्यासाठी कंचुकीची गाठ सोडून यमुनेत डुंबायला उतरतेय (स्त्री सुलभ लज्जा सोडून तो येईपर्यंत त्याच्या आठवणीत डुंबतेय) यमुनेत म्हणजेच राधेच्या स्मरणात हरी प्रतिबिंबे लहरत आहेत आणि ती निळी होऊन उठतेय म्हणजेच पूर्ण कृष्णमय होऊन जातेय . आणि त्याच आठवणीतील काही सुगंधी क्षण वेचित ’तिमिर चोरटा कृष्ण’ तिच्याकडे प्रेम तृशार्त नजरेने अनिमिषपणे पाहतोय (मोर होऊनि गिळू लागला जलमौक्तिक हृषीकेश). कालांतराने काळोख गडद होतो व दुपार त्यात लुप्त होते . आता कृष्णाने मिठीत घेतल्यामुळे गौरांग राधा त्याच्यात विलीन झालीये. आणि हे अदभूत मिलन पाहण्यासाठी आकाशातील ढगांना नक्षत्रांचे नेत्र फुटले आहेत. राधाकृष्णाच्या या नैसर्गिक मिलनाला जणू सारे विश्वच साक्षी आहे.

साध्या नजरेने पाहिलं तर ही केवळ यमुनाकाठच्या वेळेची रोज होणारी सामान्य स्थित्यंतरे, पण त्यातली कवीच्या कल्पनेची अदभूत भरारी व अजोड प्रतिभाशाली शब्द योजना यामुळे ती कधीही व कितीही वेळा वाचली तरी अगांगावर रोमांच उभे राहतात. म्हणतात ना,‘जो देखे कवी वो न देखे रवी’.



प्रसाद आठल्ये
९८२०६ १३४४५

## विद्या पेठे यांना मराठी वाङ्मय परिषद पुरस्कार!

दिनांक २६ मार्च, २०२३ रोजी बडोदा येथे मराठी वाङ्मय परिषदेचा पुरस्कार सोहळा साजरा झाला. बडोद्यातील स्थानिक साहित्यिकांना उत्तेजन देण्यासाठी ही परिषद स्थानिक तसेच राज्यस्तरीय स्तरावर पुरस्कार प्रदान करते .कथा, कविता ,कादंबरी ,समीक्षा, आत्मचरित्र अशा विविध साहित्य प्रकारांसाठी हे पुरस्कार दिले जातात. यावर्षी पुरस्कार सोहळ्या



दरम्यान विलेपार्ले येथील विद्या पेठे यांना त्यांनी लिहिलेल्या ’कथा मनातल्या जनातल्या’ या कथासंग्रहासाठी बडोदा वाङ्मय परिषदेकडून पुरस्कार प्राप्त झाला. कथासंग्रहात एकूण १६ कथा आहेत .त्यातील सात कथा या विद्या पेठे यांच्या स्वतंत्र कथा आहेत या कथांमधील प्रसंग आणि घटना वाचकांना गुंतवून ठेवतात. भाषाशैली अतिशय ओघवती आहे . उरलेल्या नऊ कथा इतिहासातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या चरित्रावर आधारित आहेत . या पुरस्कार सोहळ्या सोबतच बडोद्यात सुवर्ण महोत्सवी व्याख्यानमाला ,रौप्य महोत्सवी व्याख्यानमाला, आणि सबनिस स्मृती व्याख्यानमाला अश्या तीन व्याख्यानमाला देखील होतात. यावर्षी प्रसिद्ध अनुवादिका उमाताई कुलकर्णी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले त्यांनी पुरस्कार वितरण प्रसंगी ’माझे लेखन ’या विषयावर अतिशय उत्तम विचार देखील मांडले .

## पार्ल्यातील वृक्षवैविध्य

### दुरंगी बाभूळ

आपल्या पार्ल्यात वैविध्यपूर्ण हिरवाई खूप आहे आणि ती जोपासणे, वाढवणे ह्यासाठी आग्रही, मेहनत घेणाऱ्या व्यक्ति देखील.

आजपासून आपण ह्या हिरवाईचा थोडासा आढावा घेणार आहोत. ह्यात आपण त्या वृक्षांची स्थानिक नांवं देणार आहोत पण स्थानिक नावं अनेक ठिकाणी वेगवेगळी व काही वेळेस गोंधळात टाकणारी अथवा चक्क वादग्रस्त सुद्धा असतात. त्याकरता आपण जगभरात मान्यता असलेली द्विपदी नांवं (Binomial names) आणि त्या वृक्षांचं कुळ (Family) देखील देणार आहोत. ही नावे जगभरात सर्वत्र एकच असतात त्यामुळे वनस्पतींची ओळख सुलभ व खात्रीलायक होते. औषधांसाठी अथवा संशोधनासाठी वनस्पती निवडताना ह्याचा फार उपयोग होतो. ह्या द्विपदी नावांतील पहिलं नाव हे सर्व साधारण एका प्रकारच्या वनस्पतींचा वर्ग (class) दर्शवते तर दूसरे नांव ती एकच वनस्पती दाखवणारे (species) असते. ही द्विपदी नांवं आणि कुळाची नांव लिहीताना पहिलं अक्षर कॅपिटल व बाकी सगळी अक्षरं लहान असावीत असा दंडक आहे. तसंच ही नांव ’इटॅलीक्स’ पद्धतीत लिहीलेली असावीत हा रिवाज आहे. तसंच त्या पुढे रोमन लिपीमधे ते



नांव सर्वप्रथम सुचवणाऱ्या व्यक्तीच्या नांवाची अद्याक्षरं देखील देण्याचा रिवाज आहे.

चला तर सुरवात पार्ल्यात एकमेव असणाऱ्या एका वृक्षापासून करूया.

पार्ल्यातील बहुतेकांना माहीत नसलेला हा मध्यम आकाराचा वृक्ष आहे. दुरंगी बाभूळ. Dichrostachys cinerea et Arn Family Fabaceae.

फुलं दुरंगी म्हणून Dichrostachys आणि कोवळ्या भागांवर आढळणारी लव राखाडी रंगाची (Cinerus=ashes) म्हणून cinerea .

हनूमान रस्त्यावरील हेडगेवार मैदानात पश्चिमेस उभा असलेला हा वृक्ष मूळ दक्षिण आफ्रिका व आशिया खंडातील मानला जातो. हा तसा मध्यम आकाराचा २५ फुटांपर्यंत उंची गाठणारा वृक्ष. ह्याच्या फांद्यांवर मजबूत टोकदार व एका आड एक असणारे काटे असतात पाने द्विरुक्त संयुक्त (Bipinnatly compound) असतात. म्हणजेच एक मधला दांडा (primary rachis) त्याच्या दोन्ही बाजूंस एका आड एक उप-दांडे (secondary rachis) व त्या उप-दांड्यांच्या दोन्ही बाजूस समोरासमोर काहीशा चिंचेच्या पर्णिकांसारख्या दिसणार्या पर्णिका असतात. ह्या वृक्षाचा फुलोरा खूप आगळा वेगळा व देखणा असतो. तुरा खाली लोंबता असतो. (हा लोंबता तुरा चिनी कंदीलांसारखा म्हणून ह्याला Chinese lantern tree असं देखील म्हणतात) ह्या तुऱ्यांतील देठाकडील साधारण अर्ध्या भागातील फुलं गुलाबी आणि नपुंसक तर पुढच्या अर्ध्या भागातील पिवळसर व बीज धारण क्षमता असणारी असतात. शेंगा वेड्यावाकड्या वळलेल्या असतात. हा फुलोरा मधमाशांचा खूप लाडका असतो.

पाने, कोवळ्या फांद्या व शेंगा गुरांसाठी अत्यंत पौष्टीक असतात. इतर सर्व बाभळीं प्रमाणेच हा देखील औषधी मानला जातो.

पुण्याहून साताऱ्याकडे जाताना खंबाटकी घाटात व गुहागर येथे दुर्गादेवी देवस्थानच्या भक्तनिवासाच्या मागच्या बाजूला देखील हा नजरेस पडतो.

हेडगेवार मैदानात प्रतिवर्षी उभारला जाणारा गणेश विसर्जन तलाव ह्या वृक्षाजवळच असतो तेव्हा ह्या वृक्षास व त्याच्या मुळांस हानी न पोहोचावी ही खबरदारी आपण घ्यायला हवी.



श्रीकांत सावरकर
९२२३३१४९०९

## अनलॉक जिंदगी

मार्च २०२० मध्ये कोरोनाचे संकट साऱ्या जगावर आले आणि त्या परिस्थितीत आपल्याला कोण आपलं ,कोण परकं याची जाणीव झाली. त्या संकटाने आपल्याला खूप काही शिकवले. कोरोनाच्या विळख्यात आपण असे अडकलो की, संपूर्ण जग ठप्प झाले. शाळा, कॉलेजेस, ऑफिसेस, उद्योगधंदे, मंदिरे, दळणवळणाची साधने. संपूर्ण जगच थांबले. निर्मनुष्य रस्ते पाहून जीव घाबराघुबरा व्हायचा.लोकांचे एकमेकांना भेटणे थांबले. या महामारीत कित्येकांनी आपले प्राण गमावले, अनेकांचे भावनिक, आर्थिक, अशा सगळ्याच बाजूने नुकसानही झाले.

आजही हे भयाण वास्तव आठवले, की अंगावर काटा येतो. लॉकडाऊनमधील ही परिस्थिती लवकरच आपल्याला मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे.राजेश गुप्ता निर्मित, दिग्दर्शित 'अनलॉक जिंदगी' हा चित्रपट मे महिन्यात प्रदर्शित होत आहे . या चित्रपटात पितोबाश त्रिपाठी, राजेश गुप्ता, देविका दफ्तरदार, शिवानी सुर्वे, इंदिरा कृष्णा, हेमल देव यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'अनलॉक जिंदगी'चे लेखन आणि संवादही राजेश गुप्ता यांचेच असून गीतकार नुसरत फतेही अली खान, राजेश गुप्ता आहेत. माणुसकीचे दर्शन घडवणारे प्रसंग या चित्रपटात आहेत . रक्ताच्या नात्याची माणसं कदाचित या प्रसंगात दूर गेली असतील ,पण माणुसकी जपणाऱ्या माणसांची आपल्याला मदत झाली असेल . असे विविध प्रसंग या चित्रपटात बघायला मिळतील,




माणसाच्या मनाचे परिवर्तन करणाऱ्या या चित्रपटाची लंडन, मेक्सिको, पॅरिस आणि टोरांटो फिल्म फेस्टिवलमध्येही निवड झाली आहे. येत्या १९ मे रोजी हा चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.या सिनेमाचे संपूर्ण चित्रीकरण पुण्यात झाले आहे. दोन चित्रपट महोत्सवात या चित्रपटाला बेस्ट फिचर फिल्म आणि बेस्ट नरेटिव्ह फिचर फिल्म'चा पुरस्कारही मिळाला आहे.

**मनोरंजन विश्व**

## गेट टुगेदर

चित्रपटाचं शीर्षक जवळचं असलं की तो चित्रपट बघायची उत्सुकता मनात निर्माण होते. 'गेट टुगेदर ' हा मराठी चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे. शालेय किंवा कॉलेज जीवनात एखाद्या मुलावर किंवा मुलीवर प्रेम असतं. पण काही ना काही कारणानं ते प्रेम यशस्वी होत नाही. या पहिल्या प्रेमाची पुन्हा आठवण करून देण्याचा प्रयत्न 'गेट टुगेदर' या चित्रपटात करण्यात आला आहे.सतनाम फिल्म्स प्रस्तुत गेट टुगेदर या चित्रपटाची निर्मिती समीर गोंजारी, संजय गोंजारी, आशिष धोत्रे यांनी केली आहे. चित्रपटाचं पटकथा लेखन आणि दिग्दर्शन सचिन धोत्रे. तर कथा आणि संवाद लेखन प्रवीण कुचेकर यांनी केलं आहे. अजय रणपिसे यांनी चित्रपटाला संगीत दिलं आहे. तर एकनाथ गिते, त्रिशा कमलाकर, श्रेया पासलकर, इमरान तांबोळी, संजना काळे, मिताली कोळी, सुशांत कोळी, साकिब शेख आदींच्या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत.

अत्यंत फ्रेश लुक असलेल्या 'गेट टूगेदर' या चित्रपटाविषयी जोरदार चर्चा आहे. विख्यात गायक शंकर महादेवन यांनी या चित्रपटासाठी 'वाटा दूर जाती....' हे अतिशय श्रवणीय गीत गायले आहे. या गाण्याला सोशल मीडियातून उत्तम प्रतिसाद लाभतो आहे. ठशंकर महादेवन यांचं २०२३ मधलं मराठी चित्रपटातलं हे पहिलंच गाणं आहे. अतिशय आशयघन





शब्द, श्रवणीय संगीत आणि शंकर महादेवन यांच्या आवाजामुळे या गाण्याचं कौतुक होत आहे. चित्रपट आपल्याला आवडेल अशी उत्सुकता मनात निश्चित आहे .



गणेश आचवल
९८२१२६८३९१

## व्यास क्रियेशन्स प्रकाशन तर्फे कवी रमेश सावंत यांच्या 'डॉ. होमी भाभा' या पुस्तकाचे प्रकाशन

'व्यास क्रियेशन प्रकाशन' आणि राझी वुमन वेलफेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सहयोग मंदिर हॉल, घंटाळी, ठाणे येथील आयोजित 'पुस्तक आदान प्रदान महोत्सव २०२३' येथे इतर लेखकांच्या पुस्तकासह ज्येष्ठ लेखक रमेश सावंत. यांच्या 'डॉ. होमी भाभा' या पुस्तकाचे प्रकाशन दिनांक २१ मे, २०२३ रोजी सकाळच्या सत्रात होणार आहे. पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या या प्रसंगी मान्यवर अतिथि म्हणून सुकृत खांडेकर, प्रतिभा सराफ , मेघना साने , डॉ. विजया पंडितराव आणि संध्या म्हात्रे हे उपस्थित राहणार आहेत. रमेश सावंत यांचे हे आठवे पुस्तक आणि बालसाहित्यातील पहिले पुस्तक आहे.




HAVE YOU REGISTERED?
पार्ले BAZAAR
IF NOT, THEN JOIN NOW!
www.parlebazaar.com
Vileparle's Own Business Platform

Features of Website:
- Section-Wise Web Directory with contact details of Professionals and Business Units
- Check Upcoming Real Estate Projects, Buy Sell Rent Properties
- Upcoming Tours.
- Dramas, Events, Movies Etc. in Vile Parle
- Various Sections like Finance, Education, Travel, Health, Food, Property, Fashion, Matrimony, Tech & many more.
- Blogs written by Experts

Advertisement Options :
Banners, Classifieds, Listing with Page, Deals etc.

CONTACT FOR ADVT.:
9769261182 | 8169825961 | 8779659843 | 8104286202.
Email id: marketing@parlebazaar.com
FOLLOW US ON: @parlebazaar